# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २७.०९.२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१०) इतिवृत्त**

मंगळवार दिनांक २७ सप्टेंबर २००५ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.काशीनाथ हरिभाऊ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथे दुपारी १.०० वाज्ता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. कावडे साहेबराव राणुबा
(०२) श्री. खान मुजेब मिर आलम खान
(०३) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०४) श्री. गवळी रविकान्त काशीनाथ
(०५) श्री. जगीरदार अजेजमुख्तार अहमद
(०६) सौ.जधव संगिता विठ्ठलराव
(०७) सौ.दलाल लता श्रीनिवास
(०८) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
(०९) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(१०) श्री. नासेर नहदी मोहंमद याहीया नहदी
(११) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(१२) श्री. बारवाल गजनन रामकिशन
(१३) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
(१४) श्री. विसपुते शशांक दामोधर
(१५) श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत

<u>संवाद :</u>

श्री.कवरसिंग बैनाडे : वृत्तपत्रात बातमी आली की, आठवडी बाजराचे वसुली संदर्भात ज्यांना थोड्या दिवसांपुर्वी निलंबीत केले होते त्यांना पुन्हा कामावर घेण्यात आलेले आहे. ज्या कारणामुळे त्यांना निलंबीत केले होते त्याची सर्व पुर्तता झालेली आहे का? संबधीत ठेकेदाराकडून रक्कम वसूल केलेली आहे का, नसेल तर त्यांना कामावर कशाच्या आधारे घेण्यात आलेले आहे याचा खुलासा करावा. मनपातील इतर ३५ ते ४० कर्मचारी निलंबीत आहेत, त्यांचे बाबतीत प्रशासनाने काय निर्णय घेतलेला आहे या सर्व बाबीची या सभागृहाला माहिती देणे आवश्यक आहे.

श्री.विनायक पांडे : स.सदस्यांनी आताच जेमत मांडले ते अत्यंत योग्य असून या महानगरपालिकेचे लोकनियुक्त बॉडी आहे की नाही असा प्रश्न पडतो. मा.आयुक्त हे त्यांचे अधिकारात अधिकारी कर्मचारी यांना निलंबीत करतात, पुन्हा कामावर घेतात. कामावर घेतांना त्यांना कोणत्या निकषावर कामावर घेतले जते याची माहिती सभागृहाला देत नाही संपूर्ण चौकशी झालेली होती का याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.म. नासेर नाहदी : अधिकारी/कर्मचाऱ्यांना निलंबीत करणे, पुन्हा कामावर घेणे हा प्रशासकीय कामकाजचा भाग आहे. संपूर्ण विचार करूनच प्रशासनाने कामावर घेतले असावे असे माझे मत आहे. त्यामुळे जे निर्णय घेतलेला आहे तो योग्यच आहे असे वाटते.

श्री.कवरसिंग बैनाडे : निलंबन रद्द करण्यास विरोध नाही. परंतु पूर्ण चौकशी न होता कामावर कसे घेतले असा माझा प्रश्न आहे. ज्या कारणामुळे निलंबीत केले होते त्या संदर्भातील वसुली झालेली आहे का, झालेली असेल ठिक आहे. नसेल तर कशाच्या आधारे कामावर घेण्यात आलेले आहे माहिती द्यावी.

श्री. अजीजजगीरदार : खुलासा करतांना पुर्वी जे दोन अधिकारी श्री. खैरनार व सौ. ज्ञानदा कुलकर्णी यांना निलंबीत केले होते, त्यांना कामावर कसे घेण्यात आलेले आहे, याचाही खुलासा करावा.

मा.सभापती : हा विषय पुर्वी झालेला आहे यावर चर्चा करू नये. स.सदस्य श्री बैनाडे यांनी जे मुद्दा उपस्थित केला त्यावर चर्चा करावी.

श्री.मुजीब खॉन : सभागृहात चर्चा होते व त्यामुळे स.सदस्यांना शंका निर्माण होतात. जे कर्मचारी निलंबीत आहेत त्याची चौकशी पूर्ण झालेली आहे की नाही?कोणत्या कारणामुळे त्यांना दोषी ठरविले होते व पुन्हा कामावर घेतले तर कशाच्या आधारे घेतले याचा खुलासा करावा. आम्ही कुणाच्या विरोधात नाही.

सौ.लता दलाल : श्री.खैरनार व सौ. ज्ञानदा कुलकर्णी यांचेवर प्रशासनाने ते वृत्तपत्राकडे व पत्रकाराकडे डायरेक्ट गेलेले होते म्हणून कार्यवाही केलेली होती परंतू हा मुद्दा जे होता तो भ्रष्टाचाराचा होता, अफरातफरीचा मुद्दा होता. त्याची चौकशी झाली का? त्या रकमेचा भरणा मनपा फंडात झाला आहे का, अशी आणखी किती प्रकरणे आहेत त्यांची चौकशी झाली का? त्याचा निर्णय आलेला आहे का, याची संपूर्ण माहिती देण्यात यावी व ज्या अधिकारी कर्मचाऱ्यांना कामावर घेतले ते अधिकारी दोषी नाही असे प्रशासनाच्या निदर्शनास आलेले आहे का? म्हणून त्यांना कामावर घेतले आहे. प्रशासन चुकत असेल तर ती चूक दाखवून देण्याचे काम या सभागृहाचे आहे व विना चौकशी कुणाला कामावर घेत असेल तर प्रशासन आर्थिक बाबीत गुंतलेले आहे, अशी शंका येते. कोणत्या बेसवर कामावर घेतले याची चौकशी करावी आवश्यकता वाटल्यास सीआयडी मार्फत चौकशी करावी.

श्री. अजीजजगीरदार : ज्या अधिकाऱ्यांना कामावर घेतले ते कशाच्या आधारे घेतले, याची मला माहिती नव्हती म्हणून माहिती द्यावी अशी विचारणा केलेली आहे.

श्री.मिलींद दाभाडे : श्री. रामटेके यांची चौकशी चालू आहे. चौकशी चालू असतांना त्यांना निलंबीत ठेवणे बरोबर नाही त्यांना कामावर घेतले हा योग्य निर्णय घेतलेला आहे. चौकशीमधे ते दोषी असतील तर कार्यवाही होईलच. ते वार्ड अभियंता आहेत ते नसल्याने आम्हाला अनेक अडचणींना सामोरे जवे लागत होते. त्यांना रूजू करून घेतले त्याबद्दल आम्ही अभिनंदन करतो.

श्री. गजनन बारवाल : जेजेअधिकारी कर्मचारी निलंबीत आहेत त्यांना कामावर घेण्याबाबत मी मागिल बैठकीत मुद्दा मांडलेला होता. त्या कर्मचाऱ्यानी स्थायी समिती समोर अपील करावयास पाहिजे ही सुध्दा मागणी केलेली होती. योग्य निर्णय घेता येईल असे ठरले होते. परंतु काल अचानक वृत्तपत्रात आले की काही अधिकाऱ्यांना कामावर घेतले याची माहिती सभापती म्हणून आपणांस दिलेली आहे का. किंवा

इतर पदाधिकारी यांना माहिती दिलेली आहे का. ज्या अधिकाऱ्यांना आर्थिक गैरव्यवहारामुळे निलंबीत केले जते व पुन्हा त्यांना कामावर कसे घेतले जते हा प्रश्न आहे. प्रशासनाकडून खुलासा घ्यावा त्यानंतर चर्चा करता येईल.

श्री. दिलीप गायकवाड: यापुर्वी जेप्रश्न अधिकाऱ्यांना विचारण्यात आलेले होते त्याचा खुलासा करावा. बागशेरजंग व सालारजंग या भागात एक प्लॉट अनधिकृत रित्या ४०लक्ष किंमतीत विक्री होत आहे. महानगरपालिकेची जगा आहे क्रिडांगण तसेच शाळेसाठी जगा आरक्षीत आहे. त्यावर बांधकाम चालू आहे त्या संदर्भात काय कार्यवाही केलेली आहे याचा खुलासा करावा.

सौ.लता दलाल : किती अधिकारी कर्मचारी निलंबीत आहे, कितींना कामावर घेण्यात आलेले आहे व ज्यांना घेतलेले नाही त्याची कारणे काय आहेत याचा खुलासा करावा. त्यांचे बाबतीत चौकशी झालेली आहे की नाही. दोषी ठरवलेले आहे की नाही व त्यांना किती टक्के पगार दिला जतो. त्या जगा आजही रिक्त आहे किंवा कसे यासंबंधी सविस्तर खुलासा करावा.

मा.सभापती : काही कर्मचारी अधिकारी यांना निलंबीत केलेले होते व निलंबीत करतांना त्यांचेवर चार्जेस लावण्यात आलेले होते. कार्यवाही केल्यानंतर पुन्हा कार्यवाही मागे घेण्यात आलेली आहे असे वृत्तपत्राच्या माध्यमातून समजले. त्या अनुषंगाने आज प्रश्न उपस्थित केलेले आहे. प्रशासनाने स्पष्ट खुलासा करावा की, किती कर्मचारी निलंबीत आहेत, किती लोकांवर कार्यवाही केलेली आहे. कोणत्या प्रकारचे चार्जेस ठेवण्यात आलेले होते आणि किती कर्मचाऱ्याना पुन्हा कामावर घेतलेले आहे?

उपआयुक्त(म.) : मागिल दीड महिन्यामधे एक अधिकारी व तीन कर्मचारी यांना निलंबीत केले होते व

तथा प्र.आयुक्त त्यांना पुन्हा कामावर घेतले. त्या संबधीचा खुलासा असा की, श्री.उस्मान व.लिपीक यांना प्रशासनाने शहानुरवाडी येथील बाजराच्या वसुलीच्या बाबतीत दिरंगाई व हयगय केल्यामुळे निलंबीत केले होते. विभागीय चौकशीच्या अधीन राहून त्यांना दिं.२३.९.२००५ रोजी कामावर घेण्यात आलेले आहे .त्यांचेविरूध्द विभागीय चौकशी होत असून दोषारोप पत्र सुध्दा त्यांचेवर तामिल झालेले आहे. श्री. शिरीष रामटेके, तत्कालीन मालमत्ता अधिकारी व सध्याचे वार्ड अभियंता यांना दिनांक १८.८.२००५ रोजी जफरगेट बाजरच्या धनादेश प्रकरणी निष्काळजीपणा केल्याबद्दल व सबंधीत ठेकेदाराकडे थकबाकी असतांनाही त्याच ठेकेदारास पुन्हा मुदतवाढ देण्याविषयी निष्काळजी दाखविल्याबद्दल निलंबीत करण्यात आलेले होते. संबधीत ठेकेदार यांचेकडे ८.४१ लक्ष एवढी थकबाकी होती. या संबधीचे धनादेश महानगरपालिकेला दिलेले होते व ते वटवले न गेल्यामुळे संबधीताविरूध्द महानगरपालिकेने सिटीचौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. तसेच ३.६० लक्षचा जे धनादेश होता त्याची रक्कम संबधीताने महानगरपालिकेत जमा केलेली आहे त्याच ठेकेदाराविरूध्द महापालिकेने दिं.१५.९.२००५ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे. तो गुन्हा मी स्वत: हजर राहून दाखल केलेला आहे. या दोन्ही बाबीचा विचार करून तसेच श्री. रामटेके यांचे प्रकरणात चौकशी अधिकारी म्हणून निवृत्त न्यायधिश मा.श्री. निरखी व श्री.डी.पी. कुलकर्णी यांची सादरकर्ता अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे.

या संबधीची चौकशी पुढे चालू राहिल व संबधीत अधिकारी व कर्मचाऱ्यांना या चौकशीच्या अधीन राहून दिं.२३.५.२००५ रोजे परत कामावर घेतलेले आहे. इमारत निरीक्षक श्री.शेख कादर व श्री. संगेवार यांनी दिं.७.९.२००५ रोजी दुर्घटना होवून एका महिलेचा मृत्यू झाला. यामधे कर्तव्यात कसून केल्यामूळे त्यांना निलंबीत करण्यात आलेले होते. या कर्मचाऱ्यांची एक वेतनवाढ कायमची गोठवून तसेच त्यांची अतिक्रमण विभागातून पाणीपुरवठा विभागात बदली करून त्यांना सुध्दा दिं.२३.५.२००५ रोजे पुन्हा कामावर घेण्यात आलेले आहे. ज्यावेळेस आर्थिक व्यवहार व आर्थिक बाबीचा संबध येतो तो बाजराच्या संदर्भात श्री. शिरीष रामटेके व श्री. उस्मान या दोघांची चौकशी चालू आहे. त्यांचेवरील आरोप कमी केलेले किवा त्यांना निर्दोष सोडलेले नाही. यापुर्वी जे कर्मचारी निलंबीत झालेले आहेत त्या सर्व प्रकरणाचा आढावा प्रशासनाने घेतलेला आहे. त्यात आर्थिक गैरव्यवहार, जकात धनादेश, लाचलुचपतच्या केसेस, तसेच ९ दुय्यम अवेक्षक व अभियंते यांचेविरूध्द फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल केलेले आहेत. अशीच प्रकरणे प्रशासनाकडे प्रलंबीत आहेत. शेवटचे जे प्रकरण प्रशासनाकडे प्रलबीत आहे ते श्री. राजेश जधव यांनी मद्यप्राशन करून कामावर हजर होते त्यामुळे त्यांना निलंबीत केलेले आहे. हे निलंबन २३.९.२००५ रोजे झालेले आहे. उर्वरीत प्रकरणाच्या बाबतीत प्रशासनाला तात्काळ निर्णय घेणे शक्य होणार नाही.

सौ.लता दलाल : आर्थिक गैरव्यवहाराचे प्रकरणात व ज्यांनी महानगरपालिकेची फसवणूक केली अशी किती प्रकरणे प्रलबींत आहेत व ते कर्मचारी केंव्हापासून निलंबीत आहेत याची माहिती देण्यात यावी.

उपआयुक्त(म.) : एकूण ३९ प्रकरणे असून आर्थिक गैरव्यवहारा संबधीची २६ व लाचलुचपत प्रकरणे ११ असून त्या संबधीच्या माहितीचा तक्ता थोड्याच अवधीत स.सदस्यांना देण्यात येईल. त्यावर आपण अभ्यास करून आणखी खुलासा आवश्यक असेल तो देण्यात येईल.

मा. सभापती : तो पर्यत इतर विषयावर चर्चा करावी.

श्री.मुजेब खॉन : बजेट मंजूर होवून ३ ते ४ महिने झालेले आहेत आतापर्यत किती अंदाजपत्रक तयार झालेले आहे व कोणकोणत्या विभागाचे आहे. या वर्षासाठीचे जे ७० कोटीचे बजेट विकास कामासाठी आहे ते खर्च होणार आहे का. या वर्षाचे आता २ ते ४ महिने आहेत या कालावधीत पूर्ण विकास कामे होणार आहे का, संबधित विभागातील कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता वसूलीची कामे देण्यात आलेली आहेत, अंदाजपत्रक तयार करण्याचे काम माझ्याकडे नाही अशी उत्तरे देतात. मागिल बैठकीत मा.आयुक्त यांनी संपूर्ण विकास कामावरील बजेट खर्च करण्यात येईल असे सागितले होते. केंव्हा अंदाजपत्रक मंजूरीसाठी येणार आहे, संपूर्ण विकास कामासाठीचा निधी खर्च होणार आहे की नाही, प्रशासनाने खुलासा करावा.

मा. सभापती : सन २००५-०६ चे बजेट मंजूर होवून २ ते ३ महिने झालेले असून विकास कामे होणार की नाही असा मुद्दा स.सदस्य श्री मुजेब खान यांनी उपस्थित केलेला आहे. आजपर्यंत या बजेटमधील कोणतीही निविदा वृत्तपत्रात दिलेल्या नाहीत. ७० कोटी जे विकास कामासाठी बजेट ठेवलेले आहे ते खर्च केंव्हा होणार असा मुद्दा

आहे. प्र.आयुक्त यांनी या संदर्भात खुलासा करावा. टेक्नीकल विभागाचे अधिकारी यांना सुचना देवूनही अंदाजपत्रक तयार नाही. प्रशासनाने तशी मनाई केलेली आहे का खर्चही करायचे नाही व वसुलीही करायची नाही. स्पष्ट खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त(म.) : या महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीमुळे या वर्षीचे अंदाजपत्रक मंजूर होण्यास उशीर झालेला आहे. अंदाजपत्रकांच्या संदर्भात साधारणत: एक महिण्यापूर्वी झालेल्या सभेमध्ये टेक्नीकल विभागास निर्देश देण्यात आलेले होते. प्रशासनाने तांत्रिक विभागाला असे कुठलेही निर्देश दिलेले नाही की अंदाजपत्रक तयार करू नये व सादर करू नये. या वर्षीचे बजेट किंवा उद्दीष्ट, खर्च करण्यास प्रशासन बांधील आहे. अंदाजपत्रक विविध विभागाकडून येतील ते मंजूर करण्यास अडचण नाही. किती अंदाजपत्रक तयार आहे किती प्रोसेसमध्ये आहे व किती अंतीम टप्प्यात आहे या संबधी शहर अभियंता खुलासा करतील.

शहर अभियंता : किती कोटीचे अंदाजपत्रक तयार आहे यासंबंधीची आकडेवारी सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही.

श्री.रेणूकादास वैद्य : माझ्या वार्डातील ड्रेनेजसाठी ३३ लक्ष, पाणी पुरवठा यासाठी ११ लक्ष , तसेच उद्यान व इतर अशी ४४ लक्षची तरतूद असून अद्याप पर्यत एकाही कामाचे अंदाजपत्रक तयार होवून टेंडरसाठी लेखा विभागाकडे गेलेले नाही. आज पर्यटन दिन असून या निमित्ताने पर्यटनाला चालना देण्यासाठी महानगरपालिकेने काही घोषणा केलेल्या होत्या. त्या बाबतीतही कार्यवाही झालेली दिसून येत नाही. काम चालू आहे असे म्हणून आशावादी ठेवणार आहात का. माझ्या वार्डात मित्रमंडळ हौसींग सोसायटी येथे ड्रेनेजचा प्रश्न असून त्या भागात महापालिकेने रस्ते तयार केलेले आहेत. लाईटची व्यवस्था केलेली असून खुल्या जगेवर व्यासपीठ तयार केलेले आहे. असे असतांना सुध्दा अधिकारी सांगतात की सदर सोसायटी हस्तांतर झालेली आहे की नाही ते बघावे लागेल. नगर रचना विभागाकडे संचिका उपलब्ध नाही. अशी कारणे दाखवून कामे लांबणीवर टाकायची असतील व अशी भावना प्रशासनाची असेल तर पूर्ण बजेट विकास कामावर खर्च होईल असे वाटत नाही. मागिल बैठकीत आपण सुचना दिलेल्या होत्या की ३५ कोटीचे अंदाजपत्रक तयार करावे सुचना करूनही कार्यवाही होत नसेल तर जणूनबूजून हे काम चालू आहे. एक संचिका १० ते १५ टेबलवर जते व कुणीतरी ती थांबवून ठेवायची हे योग्य नाही. सुचनांचे पालन होत नसेल तर संबधीत अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती : प्र.आयुक्त यांनी जे खुलासा केला तो समाधान कारक वाटत नाही. या वर्षीचे ७० कोटीचे बजेट विकास कामासाठी आहे. ते खर्च करणार आहात की नाही या बाबत प्रशासनाची भुमिका काय ,सभापती म्हणून जी माहिती माझ्याकडे आलेली आहे त्या नुसार वसुलीचे प्रमाण हे ५ टक्केच असून त्यामुळे येणारा पैसा हा पगारावर खर्च करायचा व विकास कामे करायची नाही असे वाटते. स्पष्ट खुलासा करण्यात यावा. प्रशासनाने तसे निर्देश दिलेले आहेत का?

उपआयुक्त(म.) : मागिल बैठकीमधे आर्थिक स्थितीबाबत अनेक वेळा चर्चा झालेली असून त्यानुसार प्रशासनाने काही उपाययोजना केलेल्या आहेत. जकातीची वसूली समाधानकारक असून उद्दीष्ट पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. इतर वसूली समाधान

कारक नाही हे मान्य आहे. उपाययोजना करीत आहोत व अंदाजपत्रक तयार करू नये असे निर्देश प्रशासनाने कोणत्याही विभागास दिलेले नाहीत. विकास कामासाठी जी रक्कम आहे ती या वर्षात पूर्ण खर्च होईल यात शंका नाही.

श्री.साहेबराव कावडे : मागिल बॉडीत मी सदस्य होतो दरवर्षी जेबजेट विकास कामासाठी ठेवण्यात येते ते खर्च होत नाही. चालू वर्षी माझ्या वार्डात २५ ते ३० लक्षचे बजेट विकास कामासाठी ठेवलेले असून एकही अंदाजपत्रक तयार नाही. मागिल बजेटमध्ये हनुमान चौक ते केंब्रीजहायस्कूल पर्यतच्या रस्त्याचे कामासाठी ६ लक्षची तरतूद होती ते काम तीन वर्षातही झालेले नाही. चिकलठाणा येथील बाजराकडे जण्यासाठी रस्त्यासाठी ५ लक्षची तरतूद होती दोन वर्षापासून तेही काम करण्यात आलेले नाही. चालू वर्षाचे पाच ते सहा महिने निघून गेलेले असून एकही अंदाजपत्रक तयार नाही. विकास कामासाठी जेबजेट आहे त्याचे अंदाजपत्रक तयार करण्याचे निर्देश दयावे त्यानंतर कामकाजचालवावे अशी माझी सूचना आहे.

श्री.दिलीप गायकवाड : मागिल काही दिवसापुर्वी वार्ड अधिकारी श्री.गिरी यांनी महानगरपालिकेच्या हातावर दिल्या तुरी अशी बातमी होती. त्यांनी ७ लक्ष कर बुडविलेला आहे का याचा खुलासा करावा.

मा.सभापती : कामे न करण्याचे निर्देश प्रशासनाने दिलेले नसतांना कोणत्याही वृत्तपत्रात अंदाजपत्रक किंवा निविदा काढण्यात आल्या असे दिसून येत नाही. स.सदस्य हे संचिकेचे जवक क्रमांकासह अधिकाऱ्यांच्या मान्यतेसाठी मागे फिरत असतांनाही कार्यवाही होत नसल्याचे दिसून येत आहे. टेक्नीकल विभागाचे अधिकारी यांना आम्ही काही विचारणा करू इच्छित नाही.

श्री.साहेबराव कावडे : जेपर्यत अंदाजपत्रक तयार होत नाही तोपर्यत ही सभा घेण्यात येवू नये असे माझे मत आहे.

सौ.लता दलाल : मागिल बैठकीत शहर अभियंता यांनी अशी माहिती दिलेली होती की ३०० अंदाजपत्रकापैकी १०० तयार झालेले आहे व पुढील बैठकीत सर्व अंदाजपत्रक मंजूरीसाठी येतील. का सादर करण्यात आलेले नाही. आम्ही चर्चा करतो याचा अर्थ काय, आम्ही महानगरपालिकेने ट्रस्टी आहोत याची जणीव प्रशासनाला करून द्यावी नसता आम्हाला जणीव करून दयावी लागेल.

श्री.मुजीब खान : आताच प्रशासनाने खुलासा केला कामे करणार आहोत. अंदाजपत्रक येतील, कामे होतील हा खुलासा तीन चार महिण्यापासून ऐकतो आहे. आजपर्यत कोणकोणत्या कामाचे कोणत्या विभागाचे अंदाजपत्रक तयार होवून स्थायी समितीच्या मान्यतेसाठी आलेले आहे? थोडया फार प्रमाणात तरी कामे झालेली असतील त्याची माहिती देण्यात यावी. विकास कामे केंव्हा होणार आहे, आजपर्यत का कार्यवाही झालेली नाही याचा खुलासा द्यावा.

श्री.रेणूकादास वैद्य : अधिकारी स्वत:हून अंदाजपत्रक का तयार करीत नाही? नगरसेवकांना संचिकेच्या मागे जवे लागते हे अत्यंत वाईट आहे. विकास व्हावा असे अधिकाऱ्यांना वाटत नाही का?

श्री.दिलीप गायकवाड : बागशेरजंग व सालारजंग भागात जी बांधकामे चालू आहेत त्या संदर्भात मला आतापर्यत खुलासा मिळालेला नाही. खुलासा जेपर्यत मिळत नाही तोपर्यत मी आपल्या डायस समोर बसत आहे.

**(याच वेळी स.सदस्य श्री दिलीप गायकवाड हे मा.सभापती यांचे डायस समोर येवून खाली बसतात)**

मा.सभापती : स.सदस्य श्री दिलीप गायकवाड यांचे प्रश्नाचा खुलासा केला जईल, त्यांनी त्यांचे जगेवर बसावे अशी विनंती आहे. निविदा केंव्हा काढणार आहे त्या तारखेची घोषणा करावी विकास कामाचा विषय आहे कामे होणार आहे की नाही, किती कामाच्या व कधी निविदा वृत्तपत्रात येणार आहे या बाबतीत ठोस घोषणा प्रशासनाने करावी.

श्री. साहेबराव कावडे : अनेक वेळा खुलासा झालेला असून कामे केव्हा होतील हा खुलासा अपेक्षीत आहे.

श्री. कवरसिंग बैनाडे : वसूली होत नसेल व विकास कामाचे अंदाजपत्रक होत नसेतील तर अधिकाऱ्यांचे पगार थांबवावेत व विकास कामे करावी.

मा.सभापती : महानगरपालिकेकडे पैसा नसेल तर मला जेवाहन व पेट्रोल साठी खर्च करण्यात येतो तो सुध्दा करू नये असे माझे मत आहे. परंतु विकासाची कामे करण्यात यावी.

श्री. गजनन बारवाल : विकास कामासाठी पैसा नसेल व इतर ठिकाणी खर्च होत असेल तर बंधन घालावे लागेल. वसुली का होत नाही, त्याची कारणे काय याचा शोध घेतला पाहिजे जेडिपॉजेट ठेवलेले आहे त्यातून कामे करावी.

श्री. कवरसिंग बैनाडे : महानगरपालिकेकडे पैसा नाही म्हणतात. नुकतीच मंत्रीमंडळाची बैठक संपन्न झाली. त्या बैठकीच्या निमित्ताने महनगरपालिकेला किती अनुदान मिळाले, या बैठकीसाठी पूर्वतयारी महणून महानगरपालिकेने किती रक्कम खर्च केलेली आहे. वृत्तपत्राच्या माध्यमातून २५ कोटी महानगरपालिकेस मंजूर केलेले आहे अशी बातमी आलेली आहे. हे सत्य आहे का याची माहिती देण्यात यावी.

श्री. गजनन बारवाल : महानगरपालिकेकडे विकास कामासाठी पैसा आहे किवा नाही याची मुख्य लेखा परिक्षक यांचेकडून माहिती घेण्यात यावी.

मा.सभापती : मुख्यलेखा परीक्षक यांनी सविस्तर खुलासा करावा.

मुख्य लेखापरीक्षक :महानगरपालिकेकडे किती निधी शिल्लक आहे त्यातून कोणकोणती कामे होणार आहे असा प्रश्न सभागृहाने उपस्थिती केलेला असून या संबधीची माहिती सध्या माझयाकडे उपलब्ध नाही. या वर्षीचे बजेट हे २३५ कोटीचे असून आतापर्यत जमा असलेली रक्कम व होणार असलेला खर्च याबाबत मुख्यलेखाधिकारी यांनी माहिती देणे संयुक्तीक होईल.

श्री. गजनन बारवाल : गेल्या तीन महिन्यामधे आपण महानगरपालिकेच्या कामकाज संबधी व इतर बाबतीत काही टिप्पणी केलेली आहे का याची माहिती देण्यात यावी.

मुख्य लेखापरीक्षक :मी दिनांक २२.७.२००५ रोजे मुख्य लेखापरीक्षक पदाचा पदभार स्विकारलेला असून त्यानंतर आठ दिवस हे माहिती घेण्यात गेले व १ ऑगस्ट २००५ पासून लेखा परीक्षणाच्या कामास सुरूवात केलेली आहे. १ ऑगस्ट पासून मी चार विभागाचे लेखा परीक्षण केलेले आहे. या संबधीची माहिती मी मा.सभापती यांना दिलेली आहे. काम करीत असतांना बारीक सारीक ज्या उणीवाच्या संदर्भात(उदा. पेन्शनची प्रकरणे आहे.वेतन निश्चितीची प्रकरणे आहेत)जे कार्यवाही होणे अपेक्षीत आहे त्या अनुषंगाने मी लेखी स्वरूपात सुचना केलेल्या आहेत.

मा. सभापती :महानगरपालिकेची जमेची बाजू जे आहे त्यात शिल्लक किती अशी भावना सदस्यांनी व्यक्त केलेली आहे व जकात वसुलीमधे कर्मचारी अधिकारी याचे पगार व प्रशासनाचा जे खर्च आहे त्यावर होत आहे. इतर वसूली ही ५ ते ६ टक्क्यापेक्षा जस्त नसल्याने कामाच्या निविदा काढल्या जत नसाव्यात असे मत सभागृहाने व्यक्त केलेले आहे. वसूलीचे प्रमाण काय आहे ही बाब मुख्य लेखापरीक्षक म्हणून आपणांस माहित पाहिजे. माहिती नसेल तर मुख्यलेखाधिकारी खुलासा करतील.

मुख्य लेखापरीक्षक : माझ्या माहिती प्रमाणे जकातीची वसूली ही ३५ कोटी झालेली आहे. एकूण उद्दीष्ट हे ८५ कोटीचे आहे ४ कोटी ही पाणीपट्टी व घरपट्टीची वसूली आहे. निश्चित वसूली किती आहे ती आकडेवारी मी आता देऊ शकणार नाही.

श्री. गजनन बारवाल : मुख्य लेखापरीक्षक यांनी आपल्याकडे ज्या ज्या सूचना दिलेल्या आहेत त्यावर एक विशेष बैठक आयोजीत करावी.

श्री.मुजेब खान : ४० ते ४५ कोटी वसूल झाल्याचे सांगण्यात येते परंतू यातून खर्च किती झालेला आहे याचा खुलासा करावा.

मा.सभापती :मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा करावा की जमा झालेल्या रक्कमेतून किती रक्कम कोणत्या कामासाठी खर्च झालेली आहे? विकास कामे किती झालेली आहेत.

श्री. दिलीप गायकवाड: हॉटेल वेदांत व एपीआय कंपनीचा जे दोन तृतियांश मालमत्ता कर कमी करण्यात आला तो कशाच्या आधारे केलेला आहे, खुलासा करावा.

श्री.बैनाडे कवरसिंग :अशोका हॉटेल परीसरात अनेक मोठमोठी बांधकामे चालू आहेत. सद्य:स्थिती काय, बांधकाम करण्यास परवानगी घेतलेली आहे का, याचा खुलासा करण्यात यावा. तसेच महानगरपालिकेला मंत्रिमडळाच्या बैठकीच्या माध्यमातून किती रक्कम प्राप्त होणार आहे?

मा. सभापती : स.सदस्य श्री.गायकवाड व श्री.बैनाडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाचा खुलासा करावा.

सहा.संचालक न.र. : सालारजंग व बागशेरजंग येथील कुठलीही संचिका बांधकामा संदर्भात या विभागाकडे दाखल नाही. जे बांधकामे चालू आहे ती अनधिकृत चालू आहेत. या संदर्भात प्रशासकीय अधिकारी यांनी खुलासा करणे संयुक्तीक ठरेल.

श्री. कवरसिंग बैनाडे : लोक अनधिकृत बांधकाम करतात तर प्रशासन काय करते. परवानगी घेतलेली नसेल तर काम का चालू आहे, कार्यवाही का होत नाही?

श्री. मुजेब खान : या भागातील किती लेआऊट मंजूर आहेत व किती बाकी आहेत? हे ले-आऊट कुणाचे आहेत याचा खुलासा करावा.

सौ. लता दलाल : तो भाग अधिकृत आहे की अनधिकृत, महानगरपालिका परवानगी देवू शकते की नाही. लेआऊट मंजूर आहे का? असे असतांनाही अनधिकृत बांधकाम चालू आहे का? सर्व बाबींचा खुलासा करण्यात यावा.

सहा.संचालक नगर रचना : लेआऊट मंजूर नाही, त्या भागातील या अनधिकृत वस्त्या आहेत. बागशेरजंग भागात काही आरक्षण आहेत. तेथे रितसर खरेदी व्यवहार होत नाही म्हणून परवानगी देत नाही. बॉण्ड पेपर वर खरेदी करार वगैरे झालेले आहेत. पी.आर. कार्डवर नाव नाही म्हणून परवानगी देत नाही.

श्री.मुजीब खान : बागशेरजंग हा भाग मोठा असून त्वरीत खुलासा करणे सोपे नाही. या भागात बरेच सर्वे नंबर येतात. या भागात किती आरक्षण आहेत, किती लोकांना लेआऊट दिले किती मोठे क्षेत्र येते याची संपूर्ण माहिती पुढील बैठकीत घेण्यात यावी.

श्री.दिलीप गायकवाड : सध्या चार एकर जमिनीवर प्लॉट झालेले असून एका प्लॉटची किमंत ६० लक्ष आहे तेथे मोठया प्रमाणात अनधिकृत बांधकाम चालू आहे ते बांधकाम का थांबविले जत नाही?

मा.सभापती : प्रशासकीय अधिकारी यांनी माहिती द्यावी.

श्री.म. नासेर नाहदी : नगर रचना अधिकारी यानी जे खुलासा केला तो दिशाभूल करणारा आहे. बागशेरजंग भागात मोठमोठी बांधकाम होत आहेत. जे लहान कुटंब नाल्याच्या कडेला घरे बांधतात त्यांनाच आपण अनधिकृत म्हणतो परंतु शहरात ज्या ठिकाणी मोठमोठी अनधिकृत बाधकामे होत आहेत त्या संदर्भात आतापर्यत कार्यवाही केलेली नाही. प्रशासनास ही सर्व माहिती असतांनाही कार्यवाही होत नाही प्रत्येक वेळेस एकाच विषयावर चर्चा होते, खुलासा बरोबर होत नाही. जे प्रश्न स.सदस्यांनी आजपर्यंत या बैठकीत उपस्थित केलेले आहेत त्या सर्वांचा खुलासा करण्यात यावा त्यानंतरच सभेचे पुढील कामकाजकरावे.

श्री.रेणूकादास वैद्य : अगदी सुरूवातीच्या बैठकीपासून शाळेच्या जगेवर झालेल्या अतिक्रमणाच्या बाबतीत मुद्दा उपस्थित करीत आहे. तसेच ज्योतीनगर शहानुरवाडी भागात सर्वे नं. ३७ मधे ८ घरे अनधिकृत झालेली असून या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला होता, पुरावाही दिला होता. अद्यापपर्यंत प्रशासकीय विभागाकडून कार्यवाही केलेली नाही माझ्या माहिती प्रमाणे प्रशासकीय अधिकारी या सर्व प्रकरणास पाठीशी घालत आहेत. तात्काळ कार्यवाही होवून अतिक्रमण काढण्यात यावे.

श्री.म. नासेर नाहदी : या संदर्भात स.सदस्य वारंवार कळकळीने प्रश्न मांडतात. तरीही कार्यवाही होत नाही वारंवार विनंती करण्याची वेळ स.सदस्यांना येते हे बरोबर नाही.

श्री.शंशाक विसपूते : वारंवार स.सदस्य सूचना करतात, प्रशासकीय विभागाकडून कार्यवाही होत नाही अतिक्रमण होत असलेले त्या भागातील सर्वसामान्य लोकांच्या लक्षात येते. परंतू प्रशासकीय विभागाच्या का लक्षात येत नाही?

सौ.लता दलाल : माझ्या माहितीप्रमाणे नगररचना विभागात बांधकाम परवानगी साठी जेंव्हा संचिका सादर होते किती परवानगी दिली या संबधीची माहिती प्रशासकीय विभागाकची दिली जते व या विभागातील इमारत निरीक्षक किंवा दुय्यम अवेक्षक हे त्या ठिकाणी जवून परवानगी पेक्षा जस्तीचे बांधकाम होत असेल तर संबधीत विभागाची परवानगी घेवून ते बांधकाम पाडले जत असावे अशी आजपरची पध्दत असावी असे वाटते. प्रशासकीय विभागाला या बद्दल काहीच माहिती नाही. कदाचित नवीन पध्दत सुरू झाली असेल. संचिका बाबत माहिती न घेता रेकॉर्डकडे जमा करायच्या अशा पध्दतीने प्रशासकीय विभाग काम करतो काय? अशीच कार्यपध्दती प्रशासकीय विभागाची असावी असे वाटते. आजही शहरात परवारनगी पेक्षा जस्तीची बांधकामे होत आहेत. मागिल बैठकीत मोंढा येथील २५/७५ प्रमाणे शॉपींग सेन्टरच्या इमारतीचे काम चालू आहे. त्या ठिकाणी परवानगी पेक्षा जस्तीचे बांधकाम होत आहे नकाशा व्यतिरिक्त बांधकाम केलेले असून नियमबाहय बांधकाम केलेले आहे. या बाबतची माहिती देणार होते, या बैठकीत माहिती देण्यात यावी. या संबधीची कार्यवाही प्रशासकीय विभागाकडून

झालेली नसेल तर संबधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी नसता बैठकीचे कामकाजहोवू देणार नाही.

श्री.मुजीब खान : कटकट गेट जवळ ११२५३ नंबरचा लेआऊट असून ओपन स्पेस आहे. मोतीवाला फंक्शन हॉल असून सबंधीत मालकांनी महानगरपालिकेच्या जगेवर अतिक्रमण केलेले आहे. या जगेला संरक्षित भिंत करण्याचे काम सुरू होते ते अद्याप केलेले नाही. शादीखाना चालू असून एका कार्यक्रमासाठी ५ ते १० हजर रूपये घेत आहे. महानगरपालिकेच्या जगेवर अतिक्रमण केलेले आहे. महानगरपालिकेच्या जगेचा वापर करीत आहे. यापुर्वीही तीन वेळस प्रश्न उपस्थित केलेला होता, खुलासा झालेला नाही.

श्री.मिलींद दाभाडे : शहरातील गरीब लोकांच्या चहाच्या, फळे विक्री करणाऱ्याच्या हातगाडयाच प्रशासकीय विभाग जप्त करते असे वाटते. इतर अनधिकृत बांधकामा संदर्भात या विभागाकडून कुठलीही कार्यवाही होत नाही. नदंनवन कॉलनी येथील महानगरपालिकेच्या खुल्या जगेवर अनधिकृत बांधकाम चालू आहे बेसमेंट पर्यत बांधकाम झालेले असून या सभागृहात वारंवार सूचना केल्या. तेथील बेसमेन्टमधील साधा एक दगड या विभागाने काढलेला नाही. आणखी काही दगड तेथे येवून पडलेले असून पून्हा काम सुरू होणार आहे. या विभागाकडे वांरवार तक्रारी करूनही कार्यवाही होत नाही. कार्यवाही होत नसेल तर या विभागावर चर्चा करायची कि नाही असा प्रश्न पडतो.

श्री.अजीजजगीरदार : औरंगपूरा येथील नाल्यावर जेबांधकाम चालू आहे त्यास नाल्यापासून वर किती फुटापर्यत उंची घेण्याची परवानगी दिलेली आहे.परवानगी प्रमाणे बांधकाम होत आहे का, या संदर्भात खुलासा करावा.

श्री.साहेबराव कावडे : पाच वर्षापासून मी या महानगरपालिकेचा सदस्य म्हणून काम करीत आहे प्रशासन कशा पध्दतीने कार्यवाही करते याचा अनुभव आलेला आहे. कोणताही प्रश्न स.सदस्यांनी उपस्थित केला तर अधिकारी ठामपणे उत्तर देतात. परंतू अमलबजवणी करीत नाही. सुचनांची अमलबजवणी होत नसेल तर अर्थ नाही. यामुळे विकास कामे होणार नाही. अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. आज परीस्थिती अशी आहे की पाणीपुरवठयाच्या लाईनवरून कोणी थोडेफार पैसे देवून अनधिकृत नळ कनेक्शन घेत आहे. महानगरपालिकेला त्याची काही माहिती नाही. ड्रेनेज लाईनवर बांधकाम होत आहे यास जबाबदार कोण, अनेक प्रश्न आहेत. परंतू त्या संबधीची कार्यवाही होत नाही. केलेल्या सूचनांची दखल घेवून कार्यवाही होत असेल तरच कामकाज चालवावे नसता थांबवावे. नगरसेवक हे नागरीकांसाठी वार्डातील विकास कामे करण्यासंबधीची सूचना करतात. ती कामे होत नसतील तर नगरसेवक म्हणून निवडून येण्यास अर्थ नाही. दिरगांईने कामे करण्याची पध्दत थांबविली जवी व तात्काळ कामे कसे होतील याकडे लक्ष द्यावे तरच या विकास होईल.

श्री.अजीजजगीरदार : सहा.संचालक नगर रचना यांची बदली करण्यात यावी. या शहरातील जगे संबधी व लेआऊट कोणता कुठे आहे याची माहिती त्यांना असणे आवशक आहे. संबधीत अधिकारी यांना त्या संबधीची काहीच माहिती नाही. त्यांची तात्काळ ठराव घेवून बदली करण्यात यावी अशी विनंती आहे.

मा.सभापती : अनधिकृत जगेच्या संबधी स.सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या व संबधीत अधिकारी यांनी काही ठिकाणी बांधकाम परवानगी देण्यात आलेली नसल्याचा खुलासा केला. प्रशासकीय अधिकारी यांनी ज्या ज्या सुचना स.सदस्यांनी मांडल्या त्या संबधी किती ठिकाणी अनधिकृत बांधकामे चालू आहेत, किती पाडण्यात आलेली आहेत. जे कार्यवाही केलेली असेल ती कोणत्या प्रकारे केली व सध्या अशी अस्तित्वात असेली बांधकामे किती आहेत याची सविस्तर माहिती द्यावी.

प्रशासकीय अधिकारी : सद्य:स्थितीत रमानगर सालारजंग भागात चार बांधकामे सुरू होती ती बांधकामे थांबविण्यात आलेली आहेत. मालकी हक्काबाबत कागदपत्र उपलब्ध न झाल्यामूळे कायदेशीर कार्यवाही करता आलेली नाही. मालकी हक्काबाबतची कागदपत्रे तपासून त्यांचे विरूध्द पोलीसात गुन्हा दाखल करण्यात येईल.

मा.सभापती : प्रशासकीय विभागास जे अधिकार आहे त्या मर्यादेत राहूनच खूलासा करावा मालकी कुणाची आहे त्याचे कागदपत्र ठेवण्याची जबाबदारी त्या मालकाची असते. आणि तो माहिती ठेवत नसेल व बांधकाम करीत असेल तर संबधीत विभागाचे अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्यापासून दूर जता कामा नये. तात्काळ कार्यवाही केली पाहिजे नसता आपल्याविरूध्द कार्यवाही प्रस्तावित होईल. जे बाधंकाम चालू आहे त्याचे विरूध्द काय कार्यवाही केलेली आहे त्याचा खुलासा करावा.

प्रशासकीय अधिकारी : प्राथमिक अवस्थेत चालू असलेली काही अनधिकृत बांधकामे १.९.२००५ रोंजी थांबविण्यात आलेली असून त्यांचे साहित्य जप्त करण्यात आलेले होते. सध्या तेथे बांधकाम चालू नाही. झालेले बांधकाम काढण्यासंबधी अतिक्रमण विभागाचे पथक व पोलीस पथक घेवून कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.

श्री.रेणूकादास वैद्य : त्या भागात मोठमोठ्या इमारती बंगले झालेले आहेत. कुंदा नावाचा एक बंगला आहे. त्या संबधी काय कार्यवाही केलेली आहे माहिती दयावी.

प्रशासकीय अधिकारी : श्री.वायकोस यांचेवर सन २००४ मध्ये पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सौ.लता दलाल : अनधिकृतपणे बांधकाम झालेले असेल तर ३/७/१५ दिवसाची नोटीस देवून असे बांधकाम पाडता येते अशी तरतूद आहे. अशी किती बांधकामे पाडण्यात आलेली आहेत याचा खुलासा करावा. कार्यवाही चालू आहे, बांधकाम चालू होते ते थांबविले, गुन्हा दाखल करणार आहे, बांधकाम पाडणार आहेत अशी उत्तरे देणे योग्य नाही.

श्री.मुजीब खॉन : कटकटगेट मोतीवाला हॉल समोर मोठी खुली जगा आहे. त्या जगेला संरक्षित भिंत करण्याचे काम दिलेले होते. काम केलेले नसून मोतीवाला हॉलचे मालक यांनी समोरील जगेवर महानगरपालिकेच्या जगेतील काही जगा घेवून संरक्षित भिंत केली व त्यामधे येणाऱ्या जगेवर अनधिकृतपणे बांधकाम केलेले आहे. यापूर्वीही त्या संबधी कार्यवाही झालेली होती काय? संबधीत विभागास माहिती दिली असता त्वरीत कार्यवाही करण्यात येणार आहे असे सांगण्यात आले. महानगरपालिकेच्या जगेचा वापर करून शादीखान्यापासून संबधीत व्यक्ती व्यवसाय करीत आहे. शादीखाना हा अनधिकृत बांधलेला आहे. त्या जगेवर महानगरपालिकेने काम सुरू केले होते ते थांबविले गेले. या मागचे कारण काय

माहिती द्यावी. त्या जगेवरील किती जगेवर अतिक्रमण झालेले आहे, सहा. संचालक नगररचना यांचेकडून खुलासा घ्यावा.

श्री.विनायक पांडे : अनधिकृत वस्त्या करण्यामागे जे कारणीभूत असतात जे २० बाय ३० चे जे प्लॉट पाडून विक्री करतात अशा किती लोकांवर गुन्हे दाखल करणे किंवा इतर कार्यवाही केलेली आहे. बेगमपुरा येथे विद्युत कॉलनीला लागून ३ एकर इनामी जगा होती. त्या ठिकाणी संपूर्ण वसाहत झालेली असून महानगरपालिकेने सर्व सोयीसुविधा तेथे दिलेल्या आहेत. अशा किती लोकांना नोटीसेस दिल्या आहेत याचाही खुलासा करावा.

मा.सभापती : स.सदस्यांच्या भावना लक्षात घेवून प्रशासकीय अधिकारी यांना सुचना करण्यात येत आहे की स.सदस्यांनी सूचित केल्यानुसार त्या त्या भागात अनधिकृत बांधकाम चालू असेल तर ते आज दुपारी ४ वाजल्यापासून बांधकाम होणार नाही याची दखल घ्यावी. जर अनधिकृत बांधकाम झाले तर प्रशासन त्यास जबाबदार राहील याची नोंद घ्यावी .प्रशासनच अनधिकृत वसाहती होण्यास खतपाणी घालते अशी भावना निर्माण होईल. याची जबाबदारी प्रशासन व प्रशासकीय अधिकारी यांचेवर राहील. कटकटगेट येथील मोतीवाला हॉलच्या संदर्भात तसेच नंदनवन कॉलनी येथील बांधकामाच्या संदर्भातही खुलासा करावा.

सहा.संचालक नगररचना : कटकटगेट येथील सिटी सर्वे नं.११२५३ च्या संदर्भात खुलासा असा की, या प्रकरणामध्ये सिटी सर्वे ऑफिसमध्ये चुकीची नोंद घेतलेली होती. त्या संबधी पाठपुरावा केलेला आहे. संबधीत ले-आऊटची प्रत मालमत्ता विभागाकडे पाठविण्यात आलेली आहे.

श्री.मुजीब खान : मोतीवाला हॉलचा जे शादीखाना तयार केला आहे तो अधिकृत आहे का महानगरपालिकेच्या खुल्या जगेवर अतिक्रमण केलेले आहे. या जगेलगत मोतीवाला हॉलच्या समोर २५ फुटाचा रस्ता असून तेथे पूर्ण ग्राउंड करण्यात आलेले आहे अनेक वेळा निदर्शनास आणूनही कार्यवाही होत नाही. मोतीवाला हॉल बांधकाम करतांना परवानगी घेतलेली होती की नाही खुलासा करावा.

सहा.संचालक (न.र.) : प्रशासकीय अधिकारी यांचा अहवाल आल्यानंतर चौकशी करून कार्यवाही केली जईल.

श्री.मुजीब खान : ले-आऊटमधे किती अतिक्रमण केलेले आहे याची माहिती अधिकारी देत नाही वारंवार हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. प्रत्यक्ष त्या जगेवर स्थळपाहणी सुध्दा झालेली असून तात्काळ कार्यवाही होईल असे सांगितले गेले. अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देतात असे अधिकारी नगररचना विभागामधे नको आहे. त्यांना त्यांचे विभागाकडे पाठवावे. सहा.संचालक नगररचना अधिकारी हे व्यवस्थित काम करीत नाही, त्यांना कुठलीही माहिती देता येत नाही. मोठमोठया लोकांशी हातमिळवणी करून काम करीत आहे.

श्री. कवरसिंग बैनाडे : या शहरात अनधिकृत घरे होवू नये, हे शहर स्वच्छ व सुंदर असावे. स.सदस्य वारंवार सूचना करतात तरीही कार्यवाही होत नाही, हे बरोबर नाही. काम करण्यास नगरसेवक किंवा इतर कुणी अडथळा आणत असेल तर तसे नाव जहीर करावे.

मा. सभापती : स.सदस्यांची भावना बरोबर आहे. सहा.संचालक नगररचना अधिकारी, प्रशासकीय अधिकारी तसेच उपआयुक्त (महसूल) यांनी संयुक्तरीत्या त्या

भागाची पाहणी करावी व त्वरीत स्थायी समितीसमोर अहवाल सादर करावा. नंदनवन कॉलनी येथील बांधकामा संबधी खुलासा करण्यात यावा.

प्रशासकीय अधिकारी : नंदनवन कॉलनी येथील बांधकामा संबधी आजच सकाळी त्या भागात भेट दिली प्लींथ लेवलचे जे बांधकाम झालेले होते तेच आहे. त्या व्यतिरिक्त बांधकाम केलेले नाही. दगड तेथे पडलेले आहते .या संदर्भात टिप्पणी तयार करून संचिका नगररचना विभागाकडे अभिप्रायासाठी पाठविण्यात आलेली आहे. ओपन स्पेसच्या संदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ठ होते. न्यायप्रविष्ठ प्रकरणातील जगेबाबतचे सिमांकन आणि ओपन स्पेसची जगा निश्चित करण्यासंदर्भाने नगररचना अधिकारी तसेच विधी सल्लागार यांचा अभिप्राय घेवून कार्यवाही होईल. सध्या त्या जगेवर बांधकाम चालू नाही.

मा. सभापती : या संदर्भात उपआयुक्त(प्रशासन) यांनी संबधीत वार्डाचे स.सदस्य यांचे बरोबर जवून स्थळ पाहणी करावी व अहवाल तयार करून योग्य ती कार्यवाही करून या सभागृहाला माहिती दयावी अशी सूचना देण्यात येत आहे.

श्री.दिलीप गायकवाड :जळगाव रस्त्यावर सुजता हौसींग सोसायटीमध्ये अनधिकृतपणे बांधकामे मोठया प्रमाणात चालू आहेत. त्या संबधी काय कार्यवाही केलेली आहे?

मा.सभापती : या सोसायटीच्या लेआऊटला अधिकृत मंजूरी दिलेली आहे का याची माहिती देण्यात यावी.

सहा.संचालक (न.र.) : सदर संस्थेचे लेआऊट रद्द केलेले असून नवीन लेआऊट टाकलेले नाही.

मा. सभापती : लेआऊट मंजूर नाही तर अनधिकृत बांधकाम होत आहे. त्या संदर्भात किती बांधकामे पाडण्यात आलेली आहे व किती लोकांना नोटीसा देण्यात आलेल्या आहेत या संबधीचा खुलासा करावा.

प्रशासकीय अधिकारी : या सोसायटीमधील दोन लोकांना नोटीसा देण्यात आलेल्या असून यापूर्वी झालेल्या बांधकामा संबधीची नोटीस संदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. ६ प्लॉटच्या बाबतीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. एकूण २० बांधकामे झालेली आहेत. या सोसायटीमधील श्री.मगरे यांचेच बांधकाम हे परवानगीनुसार झालेले आहे.

मा.सभापती : लेआऊट मंजूर होता व तो रद्द करण्याची आवशकता का पडली, लेआऊट कोणत्या तारखेला रद्द केलेला आहे, खुलासा करावा.

सहा.संचालक नगररचना : लेआऊटच्या मालकी संदर्भात न्यायालयात प्रकरण चालू होते. त्यातील १ एकर जगा दुसऱ्या व्यक्तीची होती. त्यामुळे तो लेआऊट रद्द करण्यात आलेला होता. ती संचिका माझ्याकडे आता उपलब्ध नाही.

मा.सभापती : लेआऊटला मंजूरी दिलेली होती. त्यानंतर किती वर्षानंतर तो रद्द केलेला आहे, त्या संबधीचे जहीर प्रगटन काढलेले होते का, कुणाच्या अधिकारात रद्द केला, नियमामध्ये काय तरतुद आहे? या बाबतीत सविस्तर खुलासा करावा.

सहा.संचालक नगररचना : पुढील बैठकीत लेखी अहवाल सादर करण्यात येईल. सध्या संचिका माझ्याकडे नाही.

श्री.दिलीप गायकवाड : हर्सूल टि पॉईन्टच्या बाजूला अनधिकृत मोठमोठ्या इमारती झालेल्या आहेत. कोणी अतिक्रमण केलेले आहे, माहिती देण्यात यावी.

श्री. कवरसिंग बैनाडे : संपूर्ण माहिती पुढील बैठकीत सादर करण्याची सूचना अधिकाऱ्यांना करावी. तशी ताकीद देण्यात यावी.

मा.सभापती : ज्या ज्या सूचना स.सदस्यांनी केलेल्या होत्या त्या संबधी त्या त्या विभागाला पत्र देवून मी माहिती मागविलेली होती व याच बैठकीत माहिती सादर करावी म्हणून स्पष्ट पत्र दिलेले होते.

श्री. कवरसिंग बैनाडे : मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी महानगरपालिकेला किती खर्च आलेला आहे व किती अनुदान महानगरपालिकेस जहीर झालेले आहे. याचा खुलासा करावा.

मुख्य लेखाधिकारी : महानगरपालिकेच्या आर्थिक स्थिती बाबत विचारणा केलेली होती त्यानुसार प्रत्येक महिन्यात जमा आणि खर्चाचा आढावा लेखा विभागामार्फत घेण्यात येत असतो. यानुसार ३१ ऑगस्ट २००५ पर्यत ४४.८९ कोटी रक्कम जमा झालेली होती खर्च हा ४२.७७ कोटी झालेला होता. जमा व खर्च बघता २.१३ कोटी एवढी रक्कम शिल्लक होती. मालमत्ता कर. पाणीपट्टी तसेच जकात यावर १६३ कोटीचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. ३१ ऑगस्ट २००५ पर्यत ३६.१० कोटी जकात वसूली झालेली आहे. मालमत्ता कर ३.३२ कोटी तर पाणीपट्टी ३.५२ कोटी जमा झालेला आहे. अनुदान २.८६ कोटी प्राप्त झालेले आहे. जयकवाडीची पाणीपट्टी वसूली ही ८१ लक्ष झालेली असून इतर वसूली विचारात घेता ४४.८९ कोटी वसूली झालेली आहे. पगार व भत्ते यावर मासिक ३.७५ कोटी खर्च होतो, विज बिलापोटी विद्युत मंडळास २ कोटी दयावे लागतात. गोदावरी विकास महामंडळास ६ लक्ष रॉयल्टी म्हणून दयावे लागते. सरकारी कर्जपरतफेड ३० लक्ष प्रतिमहा द्यावे लागते. छावणीस जकात हिस्सा म्हणून ८ लक्ष प्रतिमहा दयावे लागतात. शासन शिक्षण व इतर कर १५ लक्ष भरणा करावे लागतात. ठेकेदार व परतावा अनामत १५ लक्ष महाराष्ट्र डिस्टीलरीज जकात परतावा १५.५० लक्ष वाहन इंधन व देखभाल दुरूस्ती खर्च १५ लक्ष दरमहा असे एकूण ६.७५ कोटी अनिवार्य मासिक खर्च असतो. वसूली पाहता दरमहा ही ८ ते ८.५० कोटी पर्यत होते. यात ६.८९ कोटी हा अनिवार्य खर्च आहे. उर्वरीत रक्कमेतून गुत्तेदाराचे देयके व इतर खर्च भागविण्यात येतो.

मा.सभापती : जकात वगळता इतर कर वसूली ही फक्त ७ कोटीच झालेली दिसून येते. कर्मचारी व महानगरपालिकेच्या व्यवस्थापनावर जवळपास ४ कोटी खर्च दरमहा होत आहे इतर वसूली मधे ७ कोटी म्हणजेदोन महिन्याच्या पगारा एवढीच वसूली झालेली आहे असे दिसून येते. यामुळे नवीन विकास कामे करण्यास कुठेही वाव ठेवलेला नाही असे दिसते. सभागागृहाच्या वतीने प्रशासनास स्पष्ट सुचना देण्यात येत आहे की जकात वसूलीतील रक्कम पगार व इतर कामासाठी खर्च करण्यात येवू नये विकास कामावर खर्च करावा. ज्या काही निविदा अंतिम टप्प्यात असतील त्या दोन ते तीन दिवसात सादर कराव्यात. मराठवाड्याचा व या शहराचा विकास होण्याच्या दृषटीकोनातून मंत्री मंडळाची बेठक घेण्यात आलेली होती. त्या बैठकीच्या माध्यमातून महानगरपालिकेस किती अनुदान प्राप्त झालेले आहे मंत्री मंडळाच्या बैठकी निमित्त महानगरपालिकेला आलेल्या खर्चाच्या बाबतीत विचार कुणी करू नये. माहिती घेण्यात येईल. मंत्रीमंडळ हे आपल्या शहरात आलेले पाहुणे मंडळी होती, कर्तव्य म्हणून काम केलेले आहे.

मुख्य लेखाधिकारी : मंत्रीमंडळाची या शहरात बैठक झालेली होती त्या बैठकीत कोणकोणते ठराव पारीत केले त्या संबधी लेखी स्वरूपात महागरपालिकेला काही माहिती दिलेली नाही. त्यामुळे निश्चित किती अनुदान घोषित केले हे सांगता येणार नाही.

सौ. लता दलाल : वृत्तपत्राच्या माध्यमातून महानगरपालिकेस २५ कोटी जहीर केलेले आहे किती दिवसासाठी दिलेली आहे. किती वर्षासाठी किंवा किती दिवसात देणार आहे तसे लेखी महानगरपालिकेला कळविलेले आहे का?

मुख्य लेखाधिकारी : या संदर्भात काही महानगरपालिकेला कळविलेले नाही. या बैठकीच्या निमित्ताने जी किरकोळ स्वरूपाची कामे होती ती शहर अभियंता यांचे मार्फत झालेली आहेत. देयके प्राप्त झाल्यानंतर माहिती देता येईल.

मा. सभापती : मा.आयुक्त त्या बैठकीला उपस्थित होते. महानगरपालिकेस किती रक्कम प्राप्त झालेली आहे किंवा होणार आहे या बाबतीत आयुक्त म्हणून जेकाम पाहत आहेत त्यांनी खुलासा करावा.

उपआयुक्त(म.) : दिनांक २० व २१ सप्टेंबर २००५ रोजे झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत महानगरपालिकेच्या वतीने विविध प्रस्ताव ठेवण्यात आलेले होते. दिनांक २१.९.२००५ रोजे दुपारी ३.३० वाजता मा. मुख्यमंत्री यांनी पत्रकार परिषद घेतली त्या पत्रकार परीषदेची एक प्रत प्रशासनास प्राप्त झालेली आहे. त्याचे अवलोकन केले असता या शहराच्या हद्दीत एकात्मिक रस्ते विकासासाठी २५ कोटी रूपये जेमहाराष्ट्र रस्ते विकास महामडळांकडे निधी उपलब्ध करून दिला जणार आहे. सिडको येथील नाटयगृहासाठी सिडको मार्फत ४ कोटी व २ कोटी मा.खा.धुत यांचे निधीतून मिळणार आहे. असे ६ कोटी नाट्यगृहासाठी उपलब्ध करून दिलेले आहे. व या नाटयगृहाचे बांधकाम तात्काळ सुरू करावे असे निर्देश सुध्दा देण्यात आलेले आहे. मराठवाडयातील पर्यटनासाठी ७ काटी मंजूर केलेले आहे. या संदर्भात प्रशासनाने नगरविकास विभागास दिंनाक २३.९.२००५ रोजी एक पत्र देवून सदर ७ कोटी पैकी औरंगाबाद हे पर्यटनाचे प्रमुख क्रेंद्र असल्यामूळे किामन दोन कोटी रूपयांचा निधी औरंगाबाद महानगरपालिकेसाठी जे शहरातील दरवाजेव इतर पर्यटनाच्या बाबी आहे त्या विकसीत करण्यासाठी द्यावे. अशी विनंती केलेली आहे. ७ कोटी जे पर्यटनासाठी मंजूर केले ते कोणत्या जिल्हयासाठी किती आहे असे निश्चित केले नाही. ते मराठवाडयासाठी आहे म्हणून या शहरासाठी दोन कोटी मिळावे म्हणून प्रशासन प्रयत्नशील आहे. तसेच शहरातील पुतळ्यांसाठी ३० लक्षचा निधी मंजूर झालेला आहे असे एकूण महानगरपालिकेच्या हद्दीसाठी विकास करण्यासाठी रूपये ३३.०३ कोटी मंजूर केलेले आहे.

सौ.लता दलाल : २५ कोटी रस्ते विकास साठी मंजूर केले ते शहरातील रस्त्यासाठी की संपूर्ण जिल्हयासाठी तसेच सिडको नाटयगृहासाठी ४ कोटी जहीर केले दोन कोटी खासदार निधीतून येणार आहे. आणि पर्यटनासाठी ७ कोटी मंजूर केले त्यापैकी २ कोटीची मागणी केलेली आहे असा खुलासा झाला. निश्चित किती रक्कम या महानगरपालिकेस मंजूर केलेली आहे हा स्पष्ट खुलासा करावा.

श्री.विनायक पांडे : अनेक प्रस्ताव महानगरपालिकेच्या मार्फत देण्यात आलेले होते. आतापर्यत किती रक्कम मिळालेली आहे एवढाच खुलासा करावा.

मा. सभापती : किती रक्कम महानगरपालिकेच्या फंडात धनादेश द्वारे येणार आहे असा निश्चित खुलासा अपेक्षीत आहे.

उपआयुक्त(म.) : या संबधीचे अधिकृत शासन निर्णय महानगरपालिकेस अद्याप प्राप्त नाही. त्यामुळे महानगरपालिकेस किती पैसा दिला जणार आहे, वर्ग केलेला आहे या क्षणी कुठलीही माहिती प्रशासन देवू शकत नाही.

श्री. अजीजजगीरदार : बजेट मंजूर होवून ४ महिने झाले अद्याप अंदाजपत्रक मंजुरीसाठी आलेले नाही. शासनाने निधी जहीर केला त्यास आठच दिवस झालेले आहे. त्या बैठकीत महानगरपालिकेस निधी मंजूर केलेला असून किमान यासाठी एक महिनाभर वाट बघावी असे माझे मत आहे. महानगरपालिकेसाठी मोठमोठे प्रकल्प जहीर केलेले आहे. यापूर्वी कोणत्याही मुख्यमंत्र्यानी जहीर केलेले नव्हते. त्यामुळे त्यांचे अभिनंदन केले पाहिजे सिडको नाटयगृहासाठी ६ कोटी उपलब्ध करून दिलेले आहे. शासनाकडून २५ कोटी देणार मिळणार आहेत.

श्री. कवरसिंग बैनाडे : सन ९५ ते २००० पर्यत मी या सभागृहाचा सदस्य होतो. युतीच्या काळात महानगरपालिकेस २७ कोटी देण्यात आलेले होते.

सौ. लता दलाल : अनेक वेळा या शासनाने महानगरपालिकेस निधी देण्यास मान्यता दिली परंतू २००० पासून हेच ऐकावयास मिळते. जेपर्यत निधी येत नाही तो पर्यत आम्ही खरे मानायला तयार नाही.

श्री. अजीजजगीरदार : यापूर्वी तीन आमदार महोदयांनी महानगरपालिकेस भेट दिलेली होती. त्यांनी महानगरपालिकेस काय अपेक्षीत आहे अशी भावना व्यक्त केलेली होती, मा.सभापती सुध्दा तेंव्हा उपस्थित होते. जे निधी मंजूर केला तो येईल अशी खात्री आहे.

मा.सभापती : आतापर्यत महानगरपालिकेस कोणताही निधी मिळालेला नाही. सभापती म्हणून माझ्याकडे अधिकृत माहिती आहे. अधिकृत माहिती कुणाकडे असेल तर त्यांचे स्वागत केले जईल. ५ वर्षापासून नाट्यगृहाचा मुद्दा चालू आहे. सिडकोनेही बांधले नाही व महानगरपालिकेलाही बांधकाम करू दिले नाही. अशा लोकप्रतिनिधीचे कौतूक करणार आहात की सभागृहासोबत आपण राहणार आहात ही सुध्दा भुमिका आपणांस घ्यावी लागेल. किती रक्कम महानगरपालिकेस आतापर्यत मिळालेली आहे स.सदस्य श्री. जगीरदार यांचेकडे माहिती असेल तर त्यांनी द्यावी.

श्री.मिलिंद दाभाडे : माझ्या वार्डातील खुल्या जगा विकसीक्त करण्यासाठी दीड लक्षची तरतूद केलेली आहे ती रक्कम स्मशानभूमीकडे जण्यासाठी रस्ता आवशक आहे त्यासाठी खर्च करण्यास मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती : निलंबीत कर्मचाऱ्यांसंबधी माहिती सादर झालेली आहे, त्यावर काही सुचना करावयाच्या असल्यास चर्चा करावी.

सौ.लता दलाल :निलंबनामध्ये विविध विभागातील ३९ कर्मचाऱ्याचा समावेश आहे. या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कुणावरही दोषारोप सिध्द झालेला नाही किंवा कोर्टाने दोषी ठरविलेले नाही. तरी सुध्दा ते अद्याप निलंबीत आहेत. १९९० पासून त्यानंतर ६ महिन्यापर्यत कोणाचेही प्रकरण सर्वसाधारण सभेसमोर आलेले नाही. काही बाबतीत चौकशी चालू आहे पूर्ण झाली नाही असे विविध शेरे या ठिकाणी नमूद केलेले दिसून येते. क्रमांक २७ च्या श्री.तायडे यांचे बाबतीत असे दिले की त्यांचा चौकशी अहवालच प्राप्त नाही. सारखेच प्रकरण या कर्मचाऱ्याचे बाबतीत असेल तर त्यांना अद्यापपर्यंत का कामावर घेतलेले नाही? ज्यांना घेतले त्यांचेवर

अपराध सिध्द झालेला नाही. इतरांना का घेतले नाही. जे निलंबीत आहेत त्यांना ७५ किंवा ५० टक्के पगार दिला जतो. काही १९९० पासून तर काही २००३ पासूनचे कर्मचारी आहेत. काही २००५ मधील आहेत यापैकी फक्त चार कर्मचाऱ्यांना कामावर घेतलेले आहे. पदाधिकाऱ्यांना विचारण्याची गरज मा.आयुक्तांना भासली नाही. तसेच स्थायी समितीला विश्वासात घेण्याची गरज भासली नाही आणि तडका फडकी ५ ते १० मिनिटांत आदेश काढण्यात आले. अशी शंका येते की यात आर्थिक गैरव्यवहार तर झालेला नाही. किंवा कुणाचा दबाव होता याचाही खुलासा करावा.

श्री.मुजीब खॉन : अनेक दिवसांपासून कर्मचारी निलंबीत आहेत. जनतेत व स.सदस्यांमध्ये असे मत व्यक्त केले जते की मोठे अधिकाऱ्यांना ताबडतोब न्याय मिळतो कनिष्ठ कर्मचाऱ्यांना तो मिळत नाही. जे कर्मचारी निलंबीत आहेत त्या सर्वांना एकाच वेळी न्याय देण्यात यावा. न्याय द्यायचा असेल तर सर्वांना दिला पाहिजे कोणी कोर्टामधे गेल्यास त्यांचा विचार केला जत नाही. चुक झाली म्हणून काढले जते व पुन्हा कामावर घेतले जते. जे खरोखरच चुकी करतात त्यांना तात्काळ न्याय महानगरपालिका देते अशी भावना लोकांची झालेली आहे. जे ही कर्मचारी निलंबीत आहे त्यांचा एकत्रित ठराव या सभागृहात मंजूरीसाठी सादर करावा सर्वांना न्याय द्यावा. कोर्टाने किती लोकांना निर्दोष ठरविलेले आहे तीही माहिती देण्यात यावी.

श्री. गजनन बारवाल : एकीकडे आपण सर्व मा.आयुक्त यांचेवर विश्वास ठेवतो, त्यांना अधिकार देतो, पाठिंबा देतो बदलीची मोठी कार्यवाही केली पाठिंबा देण्यात आला. निलंबीत केले तरी सहकार्य केले आणि अचानक काही कर्मचाऱ्यांना कामावर घेतले त्यामुळे प्रशासनाचे वेगळे विचार बदलेले आहे असे वाटते. किंवा कुणाचा तरी दबाव आला असे वाटते. १३ ते २१ क्रमांकावर जे कर्मचारी जेई. आहेत त्यांचे बाबतीत स्थायी समितीने आदेशीत केले होते की या बाबतीत एक निर्णय घेण्यात यावा. या कर्मचाऱ्यांना पगार चालू आहे आणि एकतर्फी कार्यवाही झालेली आहे असे वाटते. प्रशासनाने काही कर्मचाऱ्याना कामावर घेतलेले आहे. सभागृहाला विश्वासात घेतले नाही. महणून यापुढे या सभागृहाचे अधिकार वापरावेत अशी विनंती आहे व या कर्मचाऱ्यांना कामावर घेण्याच्या सूचना कराव्यात.

श्री.विनायक पांडे : कर्मचारी दोषी असतील तर त्यांना निलंबीत ठेवावे. त्यांना निलंबीत ठेवून ७५ टक्के पगार देणे योग्य नसून त्यांना कामावर घेवून सेवा करून घ्यावी अशी विनंती आहे.

मा. सभापती : यात वेगवेगळ्या केसेस आहेत. सर्वांना सारखा न्याय देण्याच्या दृष्टीने प्रशासनाने निर्णय घेतला पाहिजे अशी सभागृहाची भावना आहे. प्रशासनाने याची नोंद घ्यावी व त्याप्रमाणे कार्यवाही करावी. सहा महिन्यांपेक्षा जस्त कालावधीपासून ज्या कर्मचाऱ्यांना निलंबीत ठेवले आहे, सर्वसाधारण सभा किंवा स्थायी समिती सभा सक्षम आहे. नियमानुसार काही प्रकरण स्थायी समितीसमोर येणे गरजेचे होते. त्यानंतर हे प्रकरण सर्वसाधारण सभेसमोर जणे गरजेचे होते असे माझे मत आहे. या बाबतीत खुलासा करावा.

उपआयुक्त(म.) : प्रशासनाने विविध पदावरील कर्मचाऱ्यांना निलंबीत केल्या प्रकरणी माहिती दिली आहे. श्री.तायडे, कर निरीक्षक यांचे प्रकरण याप्रमाणेच आहे अशी सूचना

स.सदस्या सौ.दलाल यांनी केली. श्री.तायडे यांनी पावती बुक क्र.२४४ गहाळ केलेले असून त्याची रक्कम अद्याप मनपा फंडात जमा नाही. या प्रकरणी त्यांचा थेट सहभाग आहे. या संदर्भात चौकशी अधिकारी म्हणून श्री.पानझडे, का.अ. यांची नियुक्ती केलेली आहे. जेपर्यंत चौकशी अहवाल येत नाही तोपर्यंत कामावर घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

सौ. लता दलाल : नुकतेच ज्या चार कर्मचाऱ्यांना कामावर घेतले त्यांचा चौकशी अहवाला आलेला आहे का?

उपआयुक्त(म.) : श्री.शिरीष रामटेके व श्री.उस्मान यांचे प्रकरणी चौकशी चालू असून चौकशीच्या अधिन राहून कामावर घेतले आहे. श्री.एम.एम.तायडे यांचे प्रकरणात थेट सहभाग आहे. त्यामध्ये पावती पुस्तक गहाळ करणे व रक्कम हडप करणे असे आरोप आहेत.

सौ. लता दलाल : सविस्तर खुलासा करावा. डायरेक्ट त्यांनी पैसे घेतले नव्हते. चौकशी का करण्यात येते? जर पैसे घेतले होते तर एफ.आय.आर.का दाखल केला नाही. चौकशी का लावण्यात आली? अहवाल आला नाही म्हणून कामावर घेतले जत नाही. इतरांना का घेतले गेले? यात विसंगती कशी, कुणाचा दबाव होता का?

उप आयुक्त (म) : श्री.तायडेंच्या प्रकरणाचा अहवाल तात्काळ मागवतो. पावती पुस्तक गहाळ करणे, पैसे फंडात जमा न करणे हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे.

सौ. लता दलाल : चौकशी होत राहील. चौकशीच्या अधिन राहून काहींना कामावर घेतले तर इतरांना का नाही, याबाबत योग्य खुलासा का मिळत नाही.

श्री.कंवरसिंग बैनाडे : कुणावरही अन्याय होऊ नये.

सौ. लता दलाल : सर्वांना सारखेच नियम लावावेत.

उप आयुक्त (म) : मालमत्ता अधिकारी व लिपिक यांना कामावर घेतांना प्रशासनाने संपूर्ण प्रकरणाची छाननी केलेली आहे. यामध्ये संबंधीत बाजराचे ठेकेदारानी मनपा फंडात पैसे जमा न करणे, चेक बाऊन्स होणे, मनपाची फसवणूक करणे याविषयी मनपाने त्यांचेवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करणे या बाबी येतात. श्री.तायडे यांचे प्रकरणात त्यांनी पावती पुस्तक गहाळ करून रक्कम हडप केलेली आहे.

सौ. लता दलाल : दोषारोप सिध्द झाले नाही, निलंबीत का केले याचा खुलासा करावा. खुलासा पटलेला नाही. सर्वांना सारखा न्याय द्यावा. प्रशासन नीट खुलासा देत नसेल तर काय कार्यवाही करणार आहोत.

मा. सभापती : इतरांना कामावर घेता येणार नाही असे स्पष्ट म्हटले आहे. काय होऊ शकते याचा तरी खुलासा करावा. मनपावर इतर कुणी अधिकार गाजवीत आहे का? कुणाला भेटल्यानंतर अशी कार्यवाही होईल का? कुणाचा दबाव होता का? समान न्याय का मिळकत नाही?

श्री.मिलींद दाभाडे : यापुर्वी काही कर्मचाऱ्यांना कामावर घेतले. असे प्रश्न उपस्थित केले नव्हते.

श्री.कंवरसिंग बैनाडे : या सभागृहात ठराव आले होते त्यानुसार कामावर घेतले. सभागृहापुढे न येता कामावर घेतले म्हणून हा प्रश्न उपस्थित झालेला आहे.

मा. सभापती : मा.आयुक्तांना निलंबनाचे अधिकार आहेत. परंतु महापालिकेत लोकनियुक्त बॉडी आहे हे विसरता येणार नाही. अधिकारी/कर्मचारी यांना वेगवेगळा न्याय देत असाल तर प्रशासनास मदत करणे शक्य होणार नाही. एकीकडे न्याय देण्याची भूमिका घेतली जते व दुसरीकडे अन्याय होतो. १९९० पासूनचे काही कर्मचारी

निलंबीत आहेत त्यांचे बाबतीत निर्णय घेतलेला नाही. प्रशासनास जे योग्य वाटेल जे कुणी येऊन भेटेल, त्यांचेच काम करणार का? दुटप्पीपणाचे धोरण राबवणार आहोत का? जनतेच्या विकासासाठी लोकनियुक्त बॉडी असताना कुणी या मनपात विकास कामात अडथळा आणण्याचा प्रयत्न करीत असेल तर जनतेस तसे उत्तर देण्यात येईल. ७० कोटींची विकास कामे करावयाची आहेत. ते न करता प्रशासन राजकारण करून कार्यवाही करीत असेल तर हे अत्यंत चुकीचे आहे. सर्व कर्मचाऱ्यांना समान संधी, समान न्याय देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.

सौ. लता दलाल : चौकशीच्या अधीन राहून सर्वांना कामावर घेण्याचे आदेश करावेत.

श्री.अजिज जहागिरदार : श्री.राचतवार नावाचे कर्मचारी कोर्टात गेले, कोर्टाने निकाला दिलेला आहे. विधी सल्लागार यांनी तो वाचून दाखववावा.

मा. सभापती : मा. आयुक्त हे कायदेशीर बाबी तपासून निर्णय घेत असतात. निलंबन केले ते परत घेतले. कुणाच्या दबावाखाली येऊन केलेले नाही. जे चांगले वाईट परिणाम असतील त्यास प्रशासन जबाबदार राहील. सर्वांना समान न्याय मिळावा ही सभागृहाची भावना आहे. सहा महिन्यापेक्षा जस्त दिवस कर्मचारी निलंबीत राहिले तर सर्वसाधारण सभा किंवा स्थायी समिती समोर येण्याची गरज पडली नाही का?

उप आयुक्त (प्र) : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(१) अन्वये शास्तीच्या ज्या तरतुदी दर्शविल्या आहेत त्यानुसार 'एखादा कर्मचारी निलंबीत करायचा असेल किंवा केला असेल त्याबाबत सहा महिन्याच्या आत सर्वसाधारण सभेला माहिती द्यावी लागणार आहे. जर निलंबन सहा महिन्याच्या आत सर्वसाधारण सभेने कायम केले नाही तर आपोआप निलंबन संपुष्टात येईल.' आतापर्यंतचे प्रेसिडेंटप्रमाणे एकही प्रकरण सर्वसाधारण सभेपुढे दिलेले नाही. यापुढे ही काळजी घेण्यात येईल.

मा. सभापती : सहा महिन्यापेक्षा जस्त कालावधीपासून निलंबीत असलेली प्रकरणे समोर आलेली आहेत. मनपा नियमानुसार चालविल्या जत असेल व या कार्यवाहीमध्ये कुणी हलगर्जीपणा केला आहे? स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभेची कुणी दिशाभूल केलेली आहे? त्यांचेवर काय कार्यवाही करणार?

उप आयुक्त (प्र) : १९८७ पासून ज्या पध्दतीने काम चालू होते ते आजपर्यंत आहे. यापुढे अशा प्रकरणांची माहिती सभागृहापुढे देण्यात येईल.

मा. सभापती : ज्या कर्मचाऱ्यांवर अन्याय झाला,त्यांचे मुलांचे शिक्षणात, कौटुंबिक समस्यांना तोंड द्यावे लागले याची जबाबदारी कुणाची आहे? सर्वसाधारण सभेच्या अधिकारावर गदा आणण्याचा निष्काळजेपणा ज्यांनी केला त्यांचेवर काय कार्यवाही प्रस्तुत करणार? नियम ५६(१) (ब) नुसार सहा महिन्यापेक्षा जस्त कालावधीपासून निलंबीत आहेत त्यांना कामावर घेण्याची तरतुद आहे. याबाबत स्पष्ट खुलासा करावा.

उप आयुक्त (म) : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(१)(ब) अन्वये ज्या कर्मचाऱ्यांना निलंबीत करण्यात आले त्याबाबतची माहिती सर्वसाधारण सभेस देणे आवश्यक आहे. या सर्व कर्मचाऱ्यांची माहिती येत्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येईल. निलंबनाची प्रकरणे तपासून कार्यवाही होईल.

सौ. लता दलाल : अनेक कर्मचारी सहा महिन्यापेक्षा अधिक कालावधीपासून निलंबीत आहेत. त्यांना त्वरीत कामावर घेण्यात यावे.

उप आयुक्त (म) : अधिकारी/कर्मचारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू होतो. ज्यावेळी ५६(१) नुसार कार्यवाही करतो त्याच वेळी महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियम १९७९ चे ४, ८, १० या तरतुदींचा वापर करतो. उर्वरीत जी प्रकरणे आहेत त्यांचे विरूध्द फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल झालेले किंवा लाचलुचपतीच्या केसेस असून काही आर्थिक व्यवहाराची प्रकरणे आहेत. लाचलुचपतीच्या संदर्भात शासनाचे स्पष्ट आहेश आहेत की, अशा प्रकरणी सखोल छाननी केल्यानंतर व शक्य तो अशा कर्मचाऱ्यांना कामावर घेऊ नये. जेणे करून समाजमध्ये वेगळा संदेश जऊ शकतो.

सौ. लता दलाल : कनिष्ठ अभियंता व दुय्यम आवेक्षक कर्मचारी जेनिलंबीत आहेत त्यांचे बाबतीत शासनाचा संदर्भ घेऊन खुलासा करीत आहात. परंतु याबाबत सर्वसाधारण सभा निर्णय घेऊ शकते. मनपा फंडातून त्यांना पगार दिला जतो त्यामुळे शासनाचे सोयीने सर्वच नियम लागू होत नाहीत.

उप आयुक्त (म) : निलंबीत असलेले क.अभियंता व दुय्यम आवेक्षक यांचेविरूध्द फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल केले. महाराष्ट्र नागरी सेवा नियमाचे कलम ४ नुसार ज्या कर्मचाऱ्यांविरूध्द फौजदारी गुन्हे दाखल केले किंवा जे ४८ तासापेक्षा जस्त कालावधीसाठी पोलीस कस्टडीमध्ये आहेत आणि ज्यांचे विरूध्द इंडियन पीनल कोडनुसार गुन्हे दाखल केले अशा कर्मचाऱ्यांना यथास्थिती कामावर घेता येते किंवा कसे हे तपासून घेऊ. परंतु प्रशासनाने जी कार्यवाही केली ती योग्यआहे. यापुढे सर्वसाधारण सभेला कळविण्यात येईल.

मा. सभापती : मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(१)(ब)मध्ये तरतुद आहे. या अधिनियमानुसार मनपा चालते म्हणून त्यातील तरतुदीनुसार कार्यवाही करावी. त्याचा अहवाल ७ तारखेपर्यंत देण्यात यावा. सभागृहाच्या अधिकारावर गदा आणण्याचे काम कुणी अधिकारी करील तर त्यांचेवर कार्यवाही केली जईल, याची सुध्दा दखल घ्यावी.

सौ. लता दलाल : सिंचन विीागात सुध्दा झालेले आहे. क.अभियंता व दुय्यम आवेक्षक यांना निलंबीत करावे म्हणून शासनाचा आदेश नाही. मनपातील कर्मचाऱ्यांवर कशाच्या आधारे कार्यवाही केली?

मा. सभापती : स्पष्ट आदेश दिलेले आहेत. आपण जेमत व्यक्त केले त्याबाबत मा.आयुक्तांनी कार्यवाही केलेली होती. प्रभारी आयुक्तांकडून उत्तर अपेक्षीत नाही. मा.आयुक्त आज उपस्थित नसल्यामुळे पुढील बैठकीत खुलासा घेतला जईल. कलम ५६(१)(ब) नुसार कार्यवाही करावी. स.सदस्य श्री.मुजेब खान यांनी जकात विभागा संदर्भात विचारलेल्या प्रश्नावर खुलासा करावा.

उप आयुक्त (म) : जकात विभागातील विविध क्रमांकाचे पावती पुस्तकामध्ये गैरव्यवहार झाल्या प्रकरणी साधारणत: जून-जुलै मध्ये झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये चर्चा झाली होती. यापुवी प्रशासनाने चौकशी सुरू केली होती. एक तक्रार शासनास प्राप्त झाली. त्याची प्रत चौकशीसाठी मा.आयुक्तांना दिली. यासंबंधीची तक्रार मनपास प्राप्त झाल्यानंतर प्रशासनाने सर्व पावती पुस्तके ताब्यात घेतली. या पावत्या एका जगेवर बसून फाडलेल्या आहेत अशी तक्रार होती. त्यामध्ये लाखो रूपयांचा

भ्रष्टाचार झाला, कर्मचाऱ्यांनी दिरंगाई केली वगैरे सर्व होते. सर्व बाजूने तपासणी केली असता औरंगाबाद मनपा जकात नियम १९८४ चे नियम २४ व २१ नुसार मनपा हद्दीतील दुकाने अस्थापना 'जकात निरीक्षक', जकात लिपिक हे तपासणी करतात. ज्या मालावर जकात कमी भरलेली आहे त्या मालाची तपासणी करून फरकाची रक्कम वसूल करतात. सन २००३-२००४ या वर्षात ४७.९३ लक्ष रक्कम या माध्यमातून वसूल केली. ज्या पावती पुस्तकांचा उल्लेख या अहवालामध्ये आहे त्या आर्थिक वर्षामध्येही या कालावधीत ५१.५० लक्ष रक्कम वसूल केली आहे. तपासणी करताना काही त्रृटी राहिलेल्या आहेत. उदा.दुकानाचे नाव न टाकणे, मालाचे वर्णन न करणे, कर्मचाऱ्याचे नांव न लिहिणे आणि ज्या रक्कमेवर वसूल केले ती एकूण रक्कम की फरकाची रक्कम आहे याचा उल्लेख आढळत नाही. या संदर्भात जकात अधिक्षक यांना सूचना दिलेल्या आहेत. या प्रकरणात जकात अधिक्षक व जकात कर्मचारी यांचा उल्लेख यात आहे. त्यांचे लेखी जबाब घेतले आहेत. शासनाकडे ज्यांनी तक्रार दिली होती त्यांना त्यांचे मत मांडण्यासाठी प्रशासनाने बोलावले होते. दोन्ही पत्ते चुकीचे निघाले व कुणीही त्या पत्त्यावर राहात नाही असा शेरा मारून ते पत्र प्रशासनास प्राप्त झाले. यावरून या तक्रारी कुणीतरी द्वेष भावनेतून केलेल्या आहेत असे वाटते. प्रशासकीय पातळीवर त्रृटी दूर करता येतील व आर्थिक गैरव्यवहार होण्याचा किंवा कुठल्याही कर्मचाऱ्यांनी गैरव्यवहार करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

श्री.मुजीब खान : ज्या पावत्या फाडल्या त्या एका ठिकाणी बसून फाडलेल्या आहेत. अधिकारी कर्मचाऱ्यांना वाचविण्यासाठी स्पष्ट सांगण्यात येते की, भ्रष्टाचार झालेला नाही. यात एक ते दीड लाखाचा भ्रष्टाचार झाला. याबाबत पूर्ण चौकशी झाली पाहिजे परंतु आजपर्यंत झालेली नाही. जकात हे उत्पन्नाचे साधन असतानाा अधिकाऱ्यांवर कार्यवाही न होण्याच्या दृष्टीने स्पष्ट खुलासा होत नाही. कोणत्याही दुकानाचे नांव नाही, नंबर नाही, मालकाचे नाव त्यावर नाही. पुस्तक क्र.९१९०१ मध्ये ९२ हजराचा घोळ आहे. ११२९० मध्ये २-३ लक्ष आहे. ही सर्व माहिती देऊनही चौकशी झालेली नाही. या संदर्भात चौकशी करून अहवाल सादर करावा.

मा. सभापती : प्रशासनाने याची नोंद घेवून दुकानाच्या, ट्रेडींग कंपनीच्या नांवासह संपूर्ण चौकशी करावी व लेखी स्वरूपात अहवाल सादर करावा. १५ मिनीटांसाठी सभा तहकूब करण्यात येते.
(३.५० वाजता सभा तहकूब. ४.२० वाजता सभेला पुन्हा सुरूवात)

**विषय क्र. ६० :**

दिनांक २४/८/२००५ (का.प.क्र.७), ३१/८/२००५ (का.प.क्र.८), १३/९/२००५ (का.प.क्र.९) रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दिनांक २४/८/२००५, ३१/८/२००५ व १३/९/२००५ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ६१ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासनाने निर्णय क्रमांक वित्त विभाग मभवा/११०५/प्र.क्र. ५/सेवा-९ मंत्रालय, मुंबई दि. १४ जुलै २००५ नुसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दि. १ जुलै २००५ महागाई भत्ता वाढ ३% मंजूर केलेली आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना दि. ०१.०७.२००५ पासून महागाई भत्ता १४% ऐवजी १७% अदा करण्यासाठी प्रती माह रू. ७.३० लक्ष खर्च अपेक्षित आहे. सन २००५-०६ च्या अर्थ संकल्पात वेतन व भत्ते अदा करण्यासाठी स्वतंत्र तरतुद करण्यात आलेली आहे. महानगरपालिका कर्मचाऱ्यांना जुलै २००५ ते ऑगस्ट २००५ पर्यंतच्या दोन महिन्याचे थकबाकी चे देयक सप्टेंबर २००५ मध्ये अदा करण्याच्या व सप्टेंबर २००५ च्या मासिक वेतनापासून नियमित पगारात १४% ऐवजी १७% महागाई भत्ता समाविष्ट करण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा.सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक वित्त विभाग मभवा/११०५/प्र.क्र. ५/सेवा-९ मंत्रालय, मुंबई दि. १४ जुलै २००५ नुसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दि. १ जुलै २००५ महागाई भत्ता वाढ ३% मंजूर केलेली असल्यानेऔरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी आणि कर्मचारी यांना दि. ०१.०७.२००५ पासून महागाई भत्ता १४% ऐवजी १७% अदा करण्यास तसेच थकबाकीची देयके अदा करण्यास आणि तद्नंतर नियमित मासिक पगारात १४% ऐवजी १७% महागाई भत्ता समाविष्ट करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२ :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पात महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांनी मालमत्ता कराचे व पाणीपट्टीची संपूर्ण थकबाकीसह मागणी रक्कमेचा भरणा करून महानगरपालिकेस सहकार्य केल्यास अशा नागरीकांचा त्या आर्थिक वर्षात महानगरपालिकेतर्फे रू. २५०००/- चा अपघात विमा उतरविण्यात येईल, या प्रस्तावास मान्यता प्राप्त झालेली आहे तसेच या करिता सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पात रू. १० लक्ष ची विशेष तरतुद करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने नॅशनल इन्शुरन्स कंपनी लि. यांचे विमा प्रतिनीधी केबल इन्शुरन्स सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे यांच्या मार्फत सदर योजनच्या विम्याची पॉलीसी काढण्याबाबत प्रस्ताव मागविण्यात आला असता त्यांनी खालील प्रमाणे प्रस्ताव सादर केलेला आहे.

१) औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मिळकतीची नोंद महानगरपालिकेच्या कर आकारणी रजिस्टरमध्ये आहे अशाच मिळकत धारकासाठी सदरील योजना लागु राहील.

२) जेमिळकत धारक त्यांच्या नावे नोंद असलेल्या मिळकतीच्या मिळकत कराची संपूर्ण रक्कम भरतील असेच मिळकत धारक या योजनेसाठी पात्र राहतील.

३) ज्या मिळकतीची नोंद कर आकारणी रजिस्टरला आहे व अशा मिळकतीस कर माफ असेल / केला असेल तर अशा मिळकती व मिळकतधारक योजनेसाठी पात्र नाहीत.

४) सदर विमा योजनेचा कालावधी आर्थिक वर्षासाठी राहणार आहे. या कालावधीत बदल करण्याचा पुर्णत: अधिकार मा. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांना राहील.

५) विमा पॉलीसीसाठी प्रति मिळकत रक्कम रू. ६.६० सेवा करासह औरंगाबाद महानगरपालिका विमा कंपनीकडे भरणार आहे.

६) एका मिळकतीसाठी विमा पॉलीसीची मर्यादा रक्कम रू. २५०००/- पर्यंत राहील.

७) अपघातामुळे हद्दीत अथवा हद्दीबाहेर विमा धारकास अथवा त्यास नमुद व्यक्तीस मृत्यू आल्यास विम्याची पुर्ण रक्कम विमा कंपनीतर्फे दिली जईल.

८) अपघातामुळे अपंगत्व प्राप्त झाल्यास विम्याची रक्कम त्या त्या प्रमाणात दिली जईल. या बाबतचा तपशिल सोबतचे प्रपत्रात सविस्तर नमुद केला आहे.

९) मिळकतधारक स्वत: त्यांचे कुटूंबातील अन्य तीन सदस्य म्हणजेपत्नी व दोन मुले यांना या योजनेत सहभागी केले जईल.

१०) मिळकतधारकाने कराची रक्कम भरताच त्याच वेळी मिळकतधारकाने आरोग्य विमा योजना विहित फॉर्म भरावयाचा आहे. महिन्यात १ ते १५ तारखेपर्यंत जमा होणाऱ्या विमा पॉलीसीचे फॉर्मची पॉलीसी १६ तारखेपासून व १६ ते महिन्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत जमा होणाऱ्या फॉर्मची पॉलीसी त्यापूढील महिन्याच्या १ तारखेपासून विमा पॉलीसी चालू होईल.

११) मिळकत कर भरलेल्या मिळकतधारकाने एका मिळकतीसाठी एकच फॉर्म भरावयाचा आहे.

१२) एका पेक्षा अधिक मिळकतीच्या मिळकत धारकाने कर भरून प्रत्येक मिळकतीसाठी स्वतंत्र फॉर्म भरल्यास असा प्रत्येक फॉर्म विमा पॉलीसीसाठी ग्राह्य धरला जईल.

१३) एका पॉलीसीसाठी विम्याच्या रक्कमेची मर्यादा रक्कम रू. २५०००/- असल्याने एका पॉलीसीसाठी चार व्यक्तीसाठी फक्त रक्कम रू. २५०००/- पर्यंतच भरपाई दिली जईल.

उपरोक्त नुसार मिळकतधारकांचा विमा उतरविण्याचा प्रस्ताव असून महानगरपालिका क्षेत्रात सद्य स्थिती ९८००० मालमत्ता आहे. त्यापैकी ३०% मिळकत धारकांनी जरी महानगरपालिकेची १००% मिळकत कराची रक्कम महानगरपालिकेत भरणा केल्यास प्रथम वर्षी त्यांचेसाठी विमा पॉलीसी महानगरपालिकेकडून काढणे योग्य राहील या करिता साधारणत: ३०००० मिळकत धारक गृहित धरल्यास ३०००० × रू. ६.६० = रू.१९८००० विमा कंपनीकडे भरावे लागतील.

उपरोक्त नमुद नुसार मिळकत कर भरल्यावर त्या त्या कालावधीसंबंधी मिळकत धारकांची पॉलीसी महानगरपालिकतर्फे काढण्यात येईल.

करिता प्रस्ताव स्थायी समितीसमोर विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.रेणूकादास वैद्य : इतर विमा कपंन्यांना बोलविले नसेल तर त्यांनाही बोलावण्यात यावे अशी सूचना आहे.

श्री.गजनन बारवाल : १९९७ ला एक योजना लागू करण्यात आलेली होती. शाळेतील विदयार्थ्यांचा विमा काढण्यात येत असे, तो सन २००३ पासून बंद केलेला आहे अशी माझी माहिती आहे. तो पुन्हा चालू करावा अशी माझी विनंती आहे. या संदर्भात माहिती घेण्यात यावी.

मा.सभापती : इतरही आणखी काही विमा कंपन्या असतील तर त्यांचाही सहभाग घ्यावा अशी सूचना स.सदस्यांनी केलेली आहे. त्यानुसार अशा विमा कंपन्या तयार असतील तर त्यांचा समावेश करून घ्यावा अशी दुरूस्ती करून प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या विदयार्थ्यांसाठी विमा काढण्यात येत असे तो बंद केलेला असेल तर चालू करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पात महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांनी मालमत्ता कराचे व पाणीपट्टीची संपूर्ण थकबाकीसह चालू मागणी रक्कमेचा भरणा करून महानगरपालिकेस सहकार्य केल्यास अशा नागरीकांचा त्या आर्थिक वर्षात मिळकत कर भरल्यावर त्या त्या कालावधीसाठी महानगरपालिकेतर्फे नॅशनल इन्शुरन्स कंपनी लि. यांचे विमा प्रतिनीधी केबल इन्शुरन्स सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे यांच्या मार्फत रू. २५०००/- चा अपघात विमा उतरविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३ :**

मुख्य लेखाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध लेखाशिर्षांतर्गत ठेवी महानगरपालिकेच्या परिसरातील युनायटेड वेस्टर्न बँकेत असुन भविष्य निर्वाह निधी या लेखाशिर्षांतर्गत ठेवींची मुदत त्यांच्या समोर दर्शविलेल्या तारखेस पुर्ण होत असुन त्याचे नुतनीकरण पुढील ३ वर्षाच्या कालावधीसाठी केल्यास युनायटेड वेस्टर्न बँकेचे दर ८ % आहे. तरी खालील पावत्यांचे नुतनीकरण करण्यासाठीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

| अ. क्र. | ठेव क्रमांक | रक्कम (रू.) | मुदतीनंतर मिळणारी रक्कम | ठेव संपल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १) | ५४०४७७ | २६३८३२.०० | ४३२३१९.०० | २७.०९.२००५ |
| २) | ५४०४७८ | २१९८६२.०० | ३६०२६९.०० | २७.०९.२००५ |
| ३) | ५४०४७९ | ६४१८६२.०० | १०५१७६६.०० | २७.०९.२००५ |

**संवाद :**

मा.सभापती : या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते. तसेच यापुढे औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध लेखाशिर्षांतर्गत ठेवण्यात आलेल्या ठेवींचे मुदतीअंती वेळोवेळी नुतनीकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या भविष्य निर्वाह निधी या लेखाशिर्षांतर्गत ठेवींची मुदत त्यांच्या समोर दर्शविलेल्या तारखेस पुर्ण होत असल्याने पुढील ३ वर्षाच्या कालावधीसाठी खालील पावत्यांचे नुतनीकरण करण्यास तसेच यापुढे औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध लेखाशिर्षांतर्गत ठेवण्यात आलेल्या ठेवींचे मुदतीअंती वेळोवेळी नुतनीकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ. क्र. | ठेव क्रमांक | रक्कम (रू.) | मुदतीनंतर मिळणारी रक्कम | ठेव संपल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १) | ५४०४७७ | २६३८३२.०० | ४३२३१९.०० | २७.०९.२००५ |
| २) | ५४०४७८ | २१९८६२.०० | ३६०२६९.०० | २७.०९.२००५ |
| ३) | ५४०४७९ | ६४१८६२.०० | १०५१७६६.०० | २७.०९.२००५ |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४ :**

उप आयुक्त (महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारतीच्या आवारात दि युनायटेड वेस्टर्न बँकेने ए.टी.एम. सुविधा पुरविणेसाठी

सद्य:स्थितीत बँक कार्यरत असवलेल्या इमारतीच्या पश्चिम बाजूस ८x१२ या आकाराची जगा उपलब्ध करून देण्यासाठी विनंती केलेली होती. त्यानुसार महानगरपालिकेतील प्रथमश्रेणी ते चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन व्यवस्थितरित्या करता यावे म्हणून मा.आयुक्त यांनी सहाय्यक संचालक नगर रचना यांच्यासह बैठक आयोजित करून जगा उपलब्ध करून देण्यासाठी तत्वत: मान्यता दिलेली आहे.

दि युनायटेड वेस्टर्न बँक यांना ए.टी.एम. सुविधा पुरविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या ८.८६ चौ.मी. या खुल्या जगेचे भाडे रू.७५४/- प्रती माह व रू.५/- प्रती माह प्रति चौ.मी. या दराने सेवा कर व लागू होणारा मालमत्ता कर व इतर करांची वसुली संबंधीताकडून घेण्यात यावी व सदर ठिकाणी आवश्यक असलेले बांधकाम बँकेने करावे व संबंधीत बँकेने विहीत नमुन्यामध्ये नोंदणीकृत करारनामा करून देण्यात यावा याबाबत भाडे समितीने दि.७/१०/२००४ रोजी मंजुरी दिलेली आहे.

करीता दि युनायटेड वेस्टर्न बँक यांना कार्यालयाच्या प्रचलीत अटी शर्तीस अधिन राहून पाच वर्षाकरिता प्रायोगिक तत्वावर जगा भाडेपट्ट्यावर देणेसाठी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.गजनन बारवाल : ए.टी.एम. चा वापर सर्वच ठिकाणी होत आहे. महानगरपालिकेत देखील एटीएमची सुविधा सुरू होत आहे ही अभिमानाची बाब आहे. परंतु आकारण्यात येत असलेले ७५४ रू भाडे हे कमी आहे असे वाटते. महत्वाच्या जगेवर हे होत आहे. कमीत कमी ३०००/-रू भाडे घेण्यात यावे.

मा.सभापती : जगेच्या भाडेचे संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. कमी भाडे असल्याचे स.सदस्यांचे म्हणणे आहे. या संदर्भात जे नियमानुसार भाडे समितीने निश्चित केल्याप्रमाणे आकारणी केली आहे. कमर्शियल वापर होणार आहे. त्या प्रमाणे जस्तीत जस्त भाडे कसे आकारता येईल तसा निर्णय घेण्यात यावा. अशी सूचना करण्यात येत आहे.

श्री. गजनन बारवाल : या जगेला कमीत कमी ३०००/-भाडे मिळू शकते. कोणत्याही प्रकारचे डिपॉजीट घेत नाही म्हणून ३०००/-रूपये भाडे आकारण्यात यावे.

मा.सभापती : ठिक आहे दुरूस्ती सह प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे दि युनायटेड वेस्टर्न बँक यांना ए.टी.एम.सुविधा पुरविण्यासाठी प्रचलित अटी व शर्तीस अधिन राहून महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे जगेचे भाडे व रू.५/- प्रति चौ.मी. पतिमहा सेवा कर तसेच लागू होणारा मालमत्ता कर यास अधिन राहून ५ वर्षाकरीता प्रायोगिक तत्वावर जगा भाडेपट्ट्यावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ६५ :</u>**

दिनांक ३१/८/२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत चर्चेनुसार फेर प्रस्ताव सादर करणे बाबत सूचित करण्यात आलेले होते. त्यानुसार प्रकरणात प्रशासनाने सर्वतोपरी विचार करून निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांची पुन्हा निवड करावी असे प्रशासनाचे मत आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास मान्यता व्हावी अशी विनंती आहे.

औरंगाबाद महानगरपालिका संचलित भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, औरंगाबाद येथे मानद समन्वयकाचे एक पद ११ महिन्यांच्या मानधन रू.५०००/- व करार पध्दतीने भरण्यासाठी जहिरात देवून अर्जमागविण्यात आले.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४(१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीने सदरील अर्जधारक उमेदवारांच्या दि.१९.७.२००५ रोजे तोंडी मुलाखती घेण्यात आल्या. मुलाखतीसाठी एकूण २५ उमेदवार उपस्थित होते.

तोंडी मुलाखतीमध्ये उपस्थित उमेदवारांपैकी सरासरी गुणानुक्रमे असलेला उमेदवार श्री.जनार्धन उध्दवराव सोनवणे यांची मानद समन्वयक म्हणून ११ महिन्याच्या मानधन व करार पध्दतीवर निवड समितीच्या शिफारशीनुसार निवड करण्यात आलेली आहे.

करिता निवड समितीच्या शिफारशीनुसार निवड केलेले श्री.जनार्धन उध्दवराव सोनवणे यांना मानद समन्वयक पदी ११ महिन्यांसाठी नियुक्तीस मान्यता देण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.मिलिंद दाभाडे : समन्वयक म्हणून ज्यांच्या नियुक्तीची शिफारस केली आहे ते सेवानिवृत्त कर्मचारी असून या पदावर सुशिक्षित बेरोजगार उमेदवाराला संधी देण्यात यावी.

मा.सभापती : हा प्रस्ताव पुन:र्विचारासाठी पुन्हा ठेवण्यात आलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रामधे सर्व बाबींची पूर्तता करण्यात आलेली आहे. जवळपास दीड कोटी रूपये त्या वास्तूवर खर्च केलेले आहेत. ज्या विचाराने केलेले आहे ते कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने जी नेमणूक प्रशासनाच्या वतीने केलेली आहे. त्यांना कुठल्याही प्रकारची पेन्शन मिळत नाही. ही नियुक्ती नसून मानधन देणार आहोत. हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

श्री.मिलींद दाभाडे : एक उमेदवार सुशिक्षित बेरोजगार होते ते पीएचडी झालेले होते. अशा सुशिक्षित लोकांनी मुलाखती दिल्यावरही त्यांची निवड करण्यात आलेली नाही. निवृत्त अधिकारी यांना नियुक्त करणे बरोबर नाही.

मा.सभापती : संबंधीतास पेन्शन मिळत नाही .

श्री.मिलिंद दाभाडे : ज्यांची नियुक्ती केली ते एका शाळेचे शिक्षक होते अशी माझी माहिती आहे.

श्री.दिलीप गायकवाड : वयोवृध्द व्यक्तीची निवड करणे योग्य नाही.

मा..सभापती : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार लोकांपर्यंत पोहोचावेत, त्यातून प्रबोधन व्हावे, त्यांचे विचारांचा प्रसार व्हावा, सुशिक्षित आणि विचारवंत पिढी निर्माण करण्याच्या दृष्टीने ज्यांना प्रदिर्घ अनुभव आहे त्यांचीच नियुक्ती प्रशासनाने केलेली आहे. त्यांचा अनुभव आपण घेवूया. हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका संचलित भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, औरंगाबाद येथे मानद समन्वयकाचे एक पद ११ महिन्यांच्या मानधन रू.५०००/- व करार पध्दतीने भरण्यासाठी निवड समितीच्या शिफारशीनुसार निवड केलेले श्री.जनार्धन उध्दवराव सोनवणे यांना मानद समन्वयक पदी ११ महिन्यांसाठी नियुक्तीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ६६ :</u>**

उप आयुक्त (महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका मुख्य कार्यालयातील कॅन्टीन चालविण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना ज.क्र.मनपा/मामअ/६१०/०५ दि.१८-५-२००५ अन्वये दैनिक वर्तमानपत्रात पसिध्दीस देवून सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या.

कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत तीन कोऱ्या निविदा विक्री झाल्या होत्या. तसेच सिलबंद निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकच निविदा प्राप्त झाली असुन ती खालील प्रमाणे आहे.

१. श्री.अलोक नरेंद्र देसाई रू.५१०१/- प्रती माह

सदर कामासाठी आधारभुत रक्कम रू.४५४९/- प्रती माह असे कार्यालयाने दर ठरविले होते. प्रत्यक्षात निविदामध्ये जस्तीचे दर श्री.अलोक नरेंद्र देसाई यांनी रू.५१०१/- प्रती माह असा दर दिला आहे. तरी नविदा धारकाने दिलेल्या दराचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

उप आयुक्त (महसूल): महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयामध्ये पुर्वी कॅन्टीन होती. प्रतिमहा ५१०१/- भाडे आकारण्यात येणार असून कॅन्टीनसाठी पाणी व विजपुरवठा या सुविधा उपलबध करून देण्यात येणार आहेत.

श्री. गजनन बारवाल : विविध महानगरपालिकांमध्ये, मंत्रालयामध्ये ज्या प्रकारच्या कॅन्टीन आहेत तशी सुसज्जकॅन्टीन आपल्या महापालिकेत असावी.

मा. सभापती : प्रशासनाने कॅन्टीनकरीता तुर्त तात्पुरती जगा तात्काळ द्यावी. दोन महिन्यात सर्व सोयींनी युक्त कॅन्टीन सुरू करण्याकरीता योग्य ठिकाणी जगा उपलब्ध करून द्यावी. या दुरूस्तीसह प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका मुख्य कार्यालयातील कॅन्टीन चालविण्यासाठी प्राप्त झालेल्या श्री.अलोक नरेंद्र देसाई यांच्या रू.५१०१/- प्रती माह या दराच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच प्रशासनाने तात्काळ कॅन्टीनकरीता तात्पुरत्या जगेची व्यवस्था करावी. दोन महिन्याचे आत सर्व सोयींनी युक्त कॅन्टीन सुरू करण्याचे दृष्टीने योग्य ठिकाणी जगा देण्यात यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला की, स्थायी समिती विषयपत्रिका क्रमांक ७ मधील विषय क्रमांक ३३ अनुसार संजयनगर भागात विविध ठिकाणी १०० मी.मी.व्यासाची डीआयके-७ जलवाहिनी टाकणेच्या कामाचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर दि.२४.८.२००५ च्या स्थायी समितीमध्ये ए.सी.जलवाहिनीचा प्रस्ताव सादर करण्याचा निर्णय घेतलेला आहे. प्रस्तावातील संजयनगर भागामध्ये दुषित पाणी येत असल्याच्या तक्रारी निवारणार्थ डी.आय.के.७ प्रकारचे पाईप वापरून जलवाहिनी करणे व अंतर्गत जलवाहिनी १०० मी.मी.ए.सी.ची घेऊन सविस्तर अंदाजपत्रक तयार केलेले आहे. प्रस्ताव पुनर्विचारार्थ सादर. मुळ प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.

संजयनगर भागात विविध ठिकाणी १०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.-७ जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन २००४-०५ च्या दरसूचीनुसार रक्कम रूपये ३,४९,०८२/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. कार्यालयाची निविदा सूचना ज.क्र.३/०५ जे की, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विकण्याच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त एक निविदा विक्री झाली व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एक सिलबंद निविदा श्री.सुरेश बी.साधवानी यांची अं.प.दरापेक्षा २६.५% जस्त दराची प्राप्त झाली.

ठेकेदार श्री.सुरेश बी. साधवानी यांनी दिलेला दर कार्यालयास जस्तीचा वाटत असल्यामुळे ठेकेदारास राबाबत वाटाघाटीसाठी मा.आयुक्त यांचे दालनात दि.१.७.२००५ रोजी बोलविण्यात आले.

वाटाघाटीच्या वेळी ठेकेदाराने उक्त काम अं.प.दरापेक्षा २१% जस्त दराने करण्यास संमती दिली असून, त्यास मा.स्थायी समिति सभेमध्ये प्रस्ताव ठेवणेसाठी मा.आयुक्तांची शिफारस झालेली आहे. तरी वाटाघाटी अंती ठरल्यानुसार श्री.सुरेश बी.साधवानी यांची अं.प.दरापेक्षा २१% जस्त दराची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री. महमंद नासेर नाहदी : काही दिवसींपुर्वी मोठया प्रमाणात पाऊस झाल्याने हर्सूल तलाव पूर्ण भरला होता. त्यामुळे माझ्या वार्डातील लोक संकटात आलेले होते. याकडे सर्व अधिकारी पदाधिकारी यांनी लक्ष देवून वेळीच दक्षता घेतली त्याबद्दल सर्व अधिकारी तसेच पदाधिकारी यांचे वार्डातील नागरीकांच्या वतीने मी आभार व्यक्त करतो.

मा.सभापती : विषय क्र ६७ ते ७२ यास मान्यता देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर भागात विविध ठिकाणी १०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.-७ जलवाहिनी टाकण्याचे कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदानुसार, निविदाधारकांशी झालेल्या चर्चेअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम श्री.सुरेश बी. साधवानी यांचेकडून अं.प.दरापेक्षा २६.५% जस्त दराऐवजी २१% जस्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ६८ :</u>**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला की, स्थायी समिति विषयपत्रिका क्रमांक ७ मधील विषय क्रमांक ३४ अनुसार बनेवाडी (गांव) जलकुंभाकरीता १५० मी.मी.व्यासाची ए.सी.व डी.आय.के. जलवाहिनी टाकणेच्या कामाचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर दि.२४.८.२००५ च्या स्थायी समितीमध्ये ए.सी.जलवाहिनीचा प्रस्ताव सादर करण्याचा निर्णय घेतलेला आहे. प्रस्तावातील मुख्य जलवाहिनी ही जलकुंभ भरण्यासाठी वापरण्यात येणार आहे, ती अनधिकृत वसाहतीमधून जत असल्याने त्या ठिकाणी लोखंडी पाईप वापरणे योग्य असल्याने त्यात बदल करू नये व इतर ठिकाणी लागणारे पाईप ए.सी.चे ठेवून सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. प्रस्ताव पुनर्विचारार्थ सादर. मुळ प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.

बनेवाडी (गाव) जलकुंभाकरीता १५० मी.मी.व्यासाची ए.सी. व डी.आय.के.जलवाहिनी टाकून, जलकुंभाची किरकोळ दुरूस्ती करणे आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन २००४-०५ च्या दरसूचीनुसार रक्कम रूपये ७,००,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. कार्यालयाची निविदा सूचना ज.क्र.३/०५ जी की, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विकण्याच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त एक निविदा विक्री झाली व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एक सिलबंद निविदा श्री.सुरेश बी.साधवानी यांची अं.प.दरापेक्षा २६.५% जस्त दराची प्राप्त झाली.

ठेकेदार श्री.सुरेश बी. साधवानी यांनी दिलेला दर कार्यालयास जस्तीचा वाटत असल्यामुळे ठेकेदारास राबाबत वाटाघाटीसाठी मा.आयुक्त यांचे दालनात दि.१.७.२००५ रोजी बोलविण्यात आले. वाटाघाटीच्या वेळी ठेकेदाराने उक्त काम अं.प.दरापेक्षा २१% जस्त दराने करण्यास संमती दिली असून, त्यास मा.स्थायी समिति सभेमध्ये प्रस्ताव ठेवणेसाठी मा.आयुक्तांची शिफारस झालेली आहे. तरी

वाटाघाटी अंती ठरल्यानुसार श्री.सुरेश बी.साधवानी यांची अं.प.दरापेक्षा २१% जस्त दराची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बनेवाडी (गाव) जलकुंभाकरीता १५० मी.मी.व्यासाची ए.सी. व डी.आय.के.जलवाहिनी टाकून, जलकुंभाची किरकोळ दुरूस्ती करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदानुसार, निविदाधारकाशी झालेल्या चर्चेअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम श्री.सुरेश बी. साधवानी यांचेकडून अं.प.दरापेक्षा २६.५% जस्त दराऐवजी २१% जस्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला की, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला की, स्थायी समिती विषयपत्रिका क्रमांक ७ मधील विषय क्रमांक ३५ अनुसार श्रीनगर उल्कानगरी येथे १०० व २०० मी.मी. ए.सी. व डी.आय.के.-७ जलवाहिनी टाकणेच्या कामाचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर दि.२४.८.२००५ च्या स्थायी समितीमध्ये ए.सी.जलवाहिनीचा प्रस्ताव सादर करण्याचा निर्णय घेतलेला आहे. प्रस्तावातील मुख्य रस्त्यावरील अस्तित्वातील पाईपलाईन ही सी.आय.ची आहे, ती पुढे डी.आय.के.-७ प्रकारचे पाईप वापरून करणे व अंतर्गत जलवाहिनी १०० मीमी ए.सी.ची घेऊन सविस्तर अंदाजपत्रक तयार केलेले आहे. प्रस्ताव पुनर्विचारार्थ सादर. मुळ प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.

श्रीनगर उल्कानगरी येथे १०० व २०० मी.मी.व्यासाची ए.सी. व डी.आय.के.-७ जलवाहिनी टाकणे आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन २००४-०५ च्या दरसूचीनुसार रक्कम रूपये ४,५०,८२२/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. कार्यालयाची निविदा सूचना ज.क्र.३/०५ जी की, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विकण्याच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त एक निविदा विक्री झाली व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एक सिलबंद निविदा श्री.सुरेश बी.साधवानी यांची अं.प.दरापेक्षा २६.५% जस्त दराची प्राप्त झाली.

ठेकेदार श्री.सुरेश बी. साधवानी यांनी दिलेला दर कार्यालयास जस्तीचा वाटत असल्यामुळे ठेकेदारास राबाबत वाटाघाटीसाठी मा.आयुक्त यांचे दालनात दि.१.७.२००५ रोजी बोलविण्यात आले. वाटाघाटीच्या वेळी ठेकेदाराने उक्त काम अं.प.दरापेक्षा २१% जस्त दराने करण्यास संमती दिली असून, त्यास मा.स्थायी समिती सभेमध्ये प्रस्ताव ठेवणेसाठी मा.आयुक्तांची शिफारस झालेली आहे. तरी वाटाघाटी अंती ठरल्यानुसार श्री.सुरेश बी.साधवानी यांची अं.प.दरापेक्षा २१% जस्त दराची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीनगर उल्कानगरी येथे १०० व २०० मी.मी.व्यासाची ए.सी. व डी.आय.के.-७ जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदानुसार, निविदाधारकाशी झालेल्या चर्चेअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम श्री.सुरेश बी. साधवानी यांचेकडून अं.प.दरापेक्षा २६.५% जस्त दराऐवजी २१% जस्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७० :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका हद्दीत गुंठेवारी कायद्याची अंमलबजवणी करण्यासाठी अनाधिकृत वसाहतींचे

सर्व्हेक्षण करणेसाठीचा ठराव क्रमांक ४६ अन्वये दि.२४/८/२००५ रोजी स्थायी समिती बैठकीत मंजूर करण्यात आला आहे. सदर ठरावाद्वारे अनाधिकृत वसाहतीचे (ढींरश्र डींरींळर्ीं डींींशू) करणेसाठी एजन्सी नेमण्याचे ठरविण्यात आले असून प्रत्येक मिळकतीसाठी रूपये १००/- एवढी रक्कम एजन्सीस देण्याचे ठरविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने दि.३/९/२००५ रोजे जहीर सूचना देवून एजन्सीकडून अर्ज मागविण्यात आले.

(अ) आलेल्या सर्व एजन्सीची दि.१९/९/२००५ रोजी मा.आयुक्त यांचे दालनात बैठक घेवून रू.८०/- प्रत्येक मिळकतीसाठी देण्याचे ठरले. पुर्वीच्या ठरावाप्रमाणे बाब ६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे एजन्सीनी सादर केलेले नकाशे हे सिटी सर्व्हे कार्यालयामार्फत प्रमाणित करून द्यावेत असा निर्णय झाला आहे. एजन्सीशी चर्चा केल्यावर ८०/- रूपये प्रत्येक मिळकतीस देवून नकाशे महानगरपालिकेने सक्षम कार्यालयाकडून प्रमाणित करून घ्यावेत असे सुचविण्यात आले आहे. सदर बाबीस मान्यता व्हावी.

(ब) सादर करण्यात येणाऱ्या प्रत्येक रेखांकनाचे अंदाजपत्रक एजन्सीने द्यावे व या अंदाजपत्रकाच्या रक्कमेच्या ०.५% रक्कम ही एजन्सीस देण्याचे ठरले. जेणे करून विकास कामांवर होणाऱ्या संभाव्य खर्चाचा अंदाजकरणे सोयीचे होईल. सदर बाबीसही मान्यता मिळावी.

(क) 'अ' मधील नमुद प्रमाणे रूपये ८०/- आणि (ढ.ख.ङ.ठ.) च्या फीसचा खर्च प्रथमत: महानगरपालिका करील आणि नंतर लोकांकडून वसूल करण्यात येईल. तर ''अ'' प्रमाणे गुंठेवारीच्या सर्व्हेचा खर्च प्रथमत: महानगरपालिका फंडातून खर्च करणेसाठी व नंतर लोकांकडून वसूल करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

करीता वरील प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

<u>**ठराव :**</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका हद्दीत गुंठेवारी कायद्याची अंमलबजवणी करण्यासाठी अनाधिकृत वसाहतींचे सर्व्हेक्षण खालील अटी-शर्तीनुसार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

(अ) आलेल्या सर्व एजन्सीची दि.१९/९/२००५ रोजे मा.आयुक्त यांचे दालनात झालेल्या बैठकीत ठरल्यानुसार पुर्वीच्या ठरावाप्रमाणे बाब ६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे एजन्सीनी सादर केलेले नकाशे हे ८०/- रूपये प्रत्येक मिळकतीस देवून नकाशे महानगरपालिकेने सक्षम कार्यालयाकडून प्रमाणित करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

(ब) सादर करण्यात येणाऱ्या प्रत्येक रेखांकनाचे अंदाजपत्रक एजन्सीने द्यावे व या अंदाजपत्रकाच्या रक्कमेच्या ०.५% रक्कम ही एजन्सीस देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

(क) ''अ'' प्रमाणे गुंठेवारीच्या सर्व्हेचा खर्च प्रथमत: महानगरपालिका फंडातून खर्च करणेस व नंतर लोकांकडून वसूल करणेसा सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>**विषय क्र. ७१ :**</u>

सहाय्यक संचालक नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौजे हर्सुल येथील सर्व्हे क्रमांक १७९/५(अ) मिळकतधारक श्री.अंबादास शंकरराव औताडे, श्री.साईनाथ शंकरराव औताडे व श्री.सोपान दत्तात्रय नारखेडे यांनी रेखांकन प्रस्ताव सादर केला आहे. त्यांच्या उक्त मिळकती मधुन मंजूर विकास योजनेनुसार १५ मीटर रूंदीचा रस्ता प्रस्तावीत असून बाधीत क्षेत्र ९३१ चौ.मी. आहे. सदर बाधीत क्षेत्राचा मोबदला मिळकतधारकाने त्यांच्या रेखांकनातील भूखंड क्रमांक २५, २६, व २७ च्या विकास खर्चामध्ये समाविष्ट करणे बाबत विनंती केलली आहे. उर्वरीत भूखंडाचे विकास खर्च मिळकतधारकाने भरणा केला आहे.

सबब मिळकतधारकाच्या उक्त विकास योजना रस्त्याचा मोबदला रूपये १०,४२,८१०/- इतका निश्चित केला असून उक्त भूखंडाचा विकास खर्च रूपये १,७३,४३६/- इतका आहे.

करिता मोबदला रक्कमेतुन विकास खर्च रक्कम वज जता (रू.१०,४२,८१० - रू.१,७३,४३६ = रू.८,६९,३७४) रूपये आठ लाख एकोणसत्तर हजर तीनशे चौऱ्याहत्तर फक्त देय होईल. तथापी मिळकतधारकाने प्रथम बाधीत क्षेत्र नोंदणीकृत दस्तऐवजस्वखर्चाने करून ७/१२ वर महानगरपालिकेच्या नांवाची नोंद करून देणे बंधनकारक राहील.

करीता वरील प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे हर्सुल येथील सर्व्हे क्रमांक १७९/५(अ) मिळकतधारक श्री.अंबादास शंकरराव औताडे, श्री.साईनाथ शंकरराव औताडे व श्री.सोपान दत्तात्रय नारखेडे यांचे मिळकतीमधुन मंजूर विकास योजना १५ मीटर रूंद रस्त्याने बाधित असलेल्या ९३१ चौ.मी. क्षेत्राचा निश्चित करण्यात आलेला मोबदला रू.१०,४२,८१०/- या रक्कमेतून त्यांच्या रेखांकनातील भूखंड क्रमांक २५, २६, व २७ चा विकास खर्च रूपये १,७३,४३६/- इतका असल्याने ही रक्कम विकास खर्चामध्ये समाविष्ट करणेस व (रू.१०,४२,८१० - रू.१,७३,४३६ = रू.८,६९,३७४) रूपये आठ लाख एकोणसत्तर हजर तीनशे चौऱ्याहत्तर फक्त मोबदला रक्कम मिळकतधारकाने उक्त बाधित क्षेत्र स्वखर्चाने महानगरपालिकेच्या नावे ७/१२ वर नोंद करून देण्याच्या अटीस अधिन राहून मिळकतधारकास मोबदला अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ७२ :</u>**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर कला आहे की, मौजेमुस्तफाबाद येथील सर्व्हे क्रमांक ४/पैकी मिळकतधारक श्री.दिपक दिगंबर पांडे व इतर यांनी रेखांकन प्रस्ताव सादर केला आहे. त्यांच्या उक्त मिळकतीमधुन मंजूर विकास योजना नुसार ३६ मीटर रूंद रस्ता प्रस्तावित असून बाधीत क्षेत्र १९३५ चौ.मी. आहे. सदर बाधीत क्षेत्राचा मोबदला मिळकतधारकाने त्यांच्या रेखांकनाच्या विकास खर्चापोटी समायोजित करणे बाबत विनंती केलेली आहे.

सबब मिळकतधारकाचा उक्त विकास योजना रस्त्याचा मोबदला रूपये १८,७९,५२४/- निश्चित केला असून विकास खर्च रूपये ६,२१,६००/- इतका आहे. करीता मोबदला रक्कमेतुन विकास खर्च रक्कम वज जता (रू.१८,७९,५२४ - रू.६,२१,६०० = रू.१२,५७,९२४) रूपये बारा लक्ष सत्तावन्न हजर नऊशे चोवीस फक्त मोबदला देय होईल. तथापी मिळकतधारकाने प्रथम उक्त बाधीत क्षेत्र नोंदणीकृत दस्तऐवजस्वखर्चाने करून ७/१२ वर महानगरपालिकेच्या नांवाची नोंद करून देणे बंधनकारक राहील.

करीता वरील प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे मुस्तफाबाद येथील सर्व्हे क्रमांक ४/पैकी मिळकतधारक श्री.दिपक दिगंबर पांडे व इतर यांचे मिळकतीमधुन मंजूर विकास योजना ३६ मीटर रूंद रस्त्याने बाधित असलेल्या १९३५ चौ.मी. क्षेत्राचा निश्चित करण्यात आलेला मोबदला रू.१८,७९,५२४/- या रक्कमेतून विकास खर्च रूपये ६,२१,६००/- वज जता (रू.१८,७९,५२४ - रू.६,२१,६०० = रू.१२,५७,९२४) रूपये बारा लक्ष सत्तावन्न हजर नऊशे चोवीस फक्त मोबदला रक्कम मिळकतधारकाने उक्त बाधित क्षेत्र स्वखर्चाने महानगरपालिकेच्या नावे ७/१२ वर नोंद करून देण्याच्या अटीस अधिन राहून मिळकतधारकास मोबदला अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३ :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौजेगारखेडा येथील सर्व्हे क्र.५३/२/२ पैकी हितसंबंधीत मिळकतधारक श्रीमती बबाबाई लक्ष्मण पवार, श्री.राजेंद्र लक्ष्मण पवार व इतर यांचे उक्त मिळकतीमधून ८० फुट व ४० फुट रूंद रस्ता प्रस्तावित आहे. ८० फुट रूंद रस्ता मध्ये गाडी मार्ग पुर्वीपासून असून गाडी मार्गाची रूंदी ३० फुट असते. त्यामुळे ३० फुट रूंद रस्ता वगळून उर्वरीत क्षेत्र ४०५० चौ.मी. व ४० फुट (१२ मीटर) रूंद रस्त्याचे संपूर्ण क्षेत्र २१३६ चौ.मी. असून सदर रस्ता सर्व्हे क्रमांक ५३/२/२ व ५३/२/१ मध्ये प्रस्तावित आहे. मिळकतधारकाने सदर रस्त्याने बाधीत क्षेत्राचा मोबदला मागणी केलेली असून मोबदला रक्कम नोंदणीकृत करारनामा ३०५७/२००४ दिनांक १५.१२.२००४ अन्वये तीन हिस्से केलेला आहे. त्यापैकी ५०% मोबदला श्रीमती बबाबाई लक्ष्मण पवार, श्री.राजेंद्र लक्ष्मण पवार व इतर, २५% मोबदला श्री.रविकिरण मधुकर सावजे व श्री.अशोक चांडूमल चोटलानी आणि २५% मोबदला श्री.शेख शकिल शेख बुढन पटेल या प्रमाणे घेण्याचे ठरलेले आहे.

उपरोक्त रस्त्या खालील बाधीत क्षेत्राचा मोबदला सर्व वजवटी जता एकूण र.रू.१,२९,३०,०२६/- (रूपये एक कोटी एकोणतीस लक्ष तीस हजर सव्वीस फक्त) निश्चित केला आहे. त्यापैकी ५०% मोबदला रू.६४,६५,०१३/- (रू.चौसष्ट लक्ष पासष्ट हजर तेरा फक्त) बाधीत क्षेत्र नोंदणीकृत दस्तऐवज (रजिष्ट्री) करतेवेळी द्यावयाचा व उर्वरीत ५०% मोबदला संपादीत क्षेत्र मिळकतधारकाने महानगरपालिकेच्या नांवे नोंद करून दिल्यानंतर द्यावयाचा आहे.

खरेदी खतासाठी एकूण रू.१४,२१,९००/- (रूपये चौदा लक्ष एकवीस हजर नऊशे फक्त) येतो. त्यापैकी ५०% खर्च मिळकतधारक व ५०% खर्च महानगरपालिकेने करावयाचे आहे.

सबब वरील प्रमाणे प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. कवरसिंग बैनाडे : प्रशासनाने प्रस्ताव ठेवलेला आहे. मंजूर करण्यास हरकत नसावी.

श्री.मुजेब खॉन : प्रशासनाने प्रस्ताव ठेवलेला आहे या संबधीची माहिती घेण्यात यावी जेकी पूर्वी ही जगा संपादन केलेली होती का? माझ्या माहिती प्रमाणे या जगेचा मोबदला देण्यात आलेला आहे. ४० व ८० फुटाचे रस्ते करण्यासाठी अनेक वेळा दोन वेळेस जगेचे पैसे काही लोकांना देण्यात आलेले आहेत. दोन व्यक्ती भांडतात न्यायालयात जतात. एक व्यक्ती निकाल घेवून येतो असे होत गेलेले आहे. पुन्हा त्याच जगेचा मोबदला देण्या बाबत प्रस्ताव समोर येतो हे बरोबर नाही. किराडपूरा भागात ६ एकर जमिन होती. महानगरपालिकेने भुंसपादन केलेली होती . या संबधी पूर्ण खूलासा झाला पाहिजे

श्री.दिलीप गायकवाड : माझ्या माहिती प्रमाणे १९१० मधे तो रस्ता सरकारी रस्ता म्हणून घोषित झालेला आहे.या रस्त्यासाठीचा मोबदला ज्यांना देणार आहोत ते त्या जमिनीचे मूळ मालक आहेत का ?

श्री.मुजेब खान : या जगेचे मूळ मालक कोण होते? आज्ञा सातबारा तयार करून होत नाही. हा सर्वे नंबर कोणता आहे याचा खुलासा प्रशासनाकडे नाही. क्षेत्र किती आहे, किती क्षेत्र बाधीत होते ते यात देण्यात आलेले नाही. जी जगा घेणार आहोत ती यापूर्वीच घेतलेली आहे, मोबदला दिलेला आहे, यात एकूण जगा किती आहे कोणत्या भागात आहे त्याची चतु:सिमा काय आहे यापूर्वी कोणती कार्यवाही केलेली होती आता काय कार्यवाहीसाठी प्रस्ताव आलेला आहे. अंदाजित प्रस्ताव सादर करण्यात येतो.

श्री.जगीरदार अजीज : जेजहीर प्रगटन दिले होते त्यात मूळ मालकाचे नाव आर पी नाथ असे दिले होते. आणि प्रस्तावामधे वेगळीच नावे नमूद आहे जहीर प्रगटन माझ्याकडे आहे, सादर करण्यात येते. नाव वेगवेगळे आहे सर्वे नंबर एकचआहे. १३२९ फसलीमधे तेथे रस्ता झालेला आहे. १९९५ मधे या रस्त्यावर डांबरीकरण झालेले आहे. हा जुना रस्ता असून जेव्हा रस्ता करण्यात येतो तेव्हा जगा भूसंपादन करूनच केला जतो यापूर्वी भूसंपादन केलेला आहे. मोबदला देण्यात आलेला आहे. एवढी रक्कम देण्यासाठी महानगरपालिकेकडे आर्थिक तरतुद नाही. मुळ अंदाजपत्रक बजेट अभावी होत नाही या प्रकरणात एवढी घाई का? असे किती प्रकरणे आहेत की भूसंपादनाची कार्यवाही होवूनही पैसे दिले जत नाही. ज्यांना उच्च न्यायालयाने निर्देश दिले १८ टक्के प्रमाणे व्याजदयावे ते देवू शकत नाही. हा प्रस्ताव स्थायी समितीचा होवू शकत नाही धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सर्वसाधारण सभेकडे हा प्रस्ताव द्यावयास पाहिजे होता. सर्वसाधारण सभेत जेपर्यत चर्चा होत नाही तोपर्यत योग्य निर्णय हे सभागृह घेवू शकत नाही.

मा.सभापती : कलम ७७ नुसार हा स्थायी समितीचा विषय आहे. प्रशासनाने ठेवलेला आहे.

श्री. अजीजजगीरदार : प्रस्तावात तसे दिलेले नाही.

श्री.मुजीब खान : दहा वर्षापूर्वी ही आम्ही व आपण या सभागृहाचे सदस्य होतो. स.नं.५१, ५२, ५३ च्या कार्यवाहीसाठी प्रयत्न करण्यात आलेले होते. कार्यवाही करता आलेली नाही. सर्वे नं ५३ मधील मूळ मालक व इतर कुणी असेल त्यांनी कागदपत्र क्लिअर केलेले आहे का? पूर्ण मालकी हक्काचे कागदपत्र नगररचना विभागाने मागविलेले आहे का? याचा खुलासा करावा. या जगेचे यापूर्वी भूसंपादन केलेले होते मोबदला देण्यात आलेला होता. पुन्हा प्रस्ताव का ठेवण्यात आलेला आहे. यापुर्वी सदर जमीन मालक यांनी पाण्याच्या टाकीसाठी विनामोबदला जगा दिलेली होती. त्यातील ही जगा आहे. सिंधोन-भिंदोनला जणारा रस्ता आहे. १९७३ पासून मी या रस्त्यावरून येतो-जतो. याचा खुलासा घ्यावा.

श्री.गजनन बारवाल : या जगेचा मोबदला अगोदरच दिलेला आहे असे मत व्यक्त करण्यात आले हे सत्य आहे का खुलासा घेण्यात यावा.प्रस्ताव ठेवलेला आहे प्रशासन दिशाभूल करीत आहे.

श्री.मिलींद दाभाडे : रस्त्यासाठी जगा संपादीत केलेली होती . संबधीतांना नोटीस देण्यात आलेल्या होती का व कुणाच्या नावाने देण्यात आलेल्या होत्या खुलासा करण्यात यावा.

श्री.जगीरदार अजीज : या संदर्भात संचिकेमध्ये मा.आयुक्तांनी शेरा दिलेला आहे. स्थायी समिती समोर हा प्रस्ताव जण्या अगोदर सर्व बाबी तपासून घ्याव्यात या जगेचा मोबदला देण्यात आलेला आहे का, क्यूरी असतांना व मा.आयुक्तांची या प्रस्तावास मान्यता नसतांना हा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरीसाठी येतो . याची सुध्दा चौकशी झाली पाहिजे

मा.सभापती :स.सदस्य यांनी मत व्यक्त केले की या संचिकेमधे मा.आयुक्त यांनी शेरा दिलेला आहे स्थायी समिती समोर जण्यापूर्वी तपासणी करावी म्हणून म्हटले. या संदर्भात अधिकारी यांनी स.सदस्यांना संचिके बाबत माहिती दिलेली होती काय ?क्यूरी काढलेली होती, कोणाशी चर्चा झाली का, तसे पत्र दिलेले आहे का?

श्री.जगीरदार अजीज : कोलंबोला जण्यापुर्वी मा.आयुक्त यांना या संदर्भात मी भेटलेलो होतो. या बाबत मी काही करणार नाही, अगोदर शहानिशा करून घेतल्यानंतरच प्रस्ताव येईल असे म्हटले होते.

मा.सभापती :मा.आयुक्त कोलंबोला जण्यापूर्वी हा विषय विषय पत्रिकेवर आलेला होता.यांचा अर्थ मा.आयुक्त स.सदस्यांना विशेष अशी माहिती देतात असे वाटते.या संबधी सविस्तर खुलासा प्रशासनाने करावा.

मा.प्र.आयुक्त : स.सदस्य श्री. जगीरदार अजेजयांनी मा.आयुक्तांशी चर्चा केलेली असेल त्यावर मी भाष्य करणे योग्य नाही.जगेचा मावेज देण्यासंबधीचा प्रस्ताव असून यासंबधी मी स्वत:मा.आयुक्त यांचेशी दुरध्वनी वरून चर्चा केली सदर प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्या अगोदर सहा.संचालक नगररचना यांना या संबधी या पूर्वी मावेज देण्यात आलेला आहे किंवा नाही या त्रृटी काढून त्यानंतरच स्थायी समिती समोर प्रस्ताव ठेवण्यात यावा अशा प्रकारचा शेरा दिलेला होता. ही संचिका मी अद्यापही बघीतलेली नाही. परंतु सहा.संचालक नगररचना यांनी या त्रृटीची पूर्तता केल्यानंतर मा.आयुक्तांची मान्यता मिळाली आहे असे ग्रहीत धरून स्थायी समिती समोर प्रस्ताव ठेवलेला आहे. कदाचित त्यांनी असा अर्थ काढला असावा की सर्व पुर्तता केल्यानंतर परत मा.आयुक्तांची आवश्यकता नाही .परंत त्रृटी काढल्यानंतरही मा.आयुक्तांची मंजूरी घेणे आवश्यक होते आणि मा.आयुक्तांबरोबर झालेल्या चर्चेनुसार हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा अशी प्रशासनाची विनंती आहे.

श्री.मुजीब खान : पुढील बैठकीत या प्रस्तावाविषयी माहिती अशी पाहिजे की या जगेचे मालक कोण होते यापूर्वी किती जगा घेण्यात आलेली होती व किती मोबदला दिलेला आहे.

श्री.मिलिंद दाभाडे : या जगेचा मालक असल्याचा दावा जे करीत आहे त्यांनी महानगरपालिकेला रस्ता बंद करण्याचे पत्र ही दिलेले आहे.शिवाजेनगर हा भाग महानगरपालिकेतून वगळण्यात आलेला असून तेथील नागरीकामधे अधिक चिड आहे भविष्यात त्या लोकांनी रस्ता बंद केला तर आणखी परीस्थिती गंभीर होवू शकते. यावर गांभीर्यपुर्वक विचार करून योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

श्री.बारवाल गजनन : प्रशासनाने व्यवस्थित माहिती दिलेली नाही व प्रस्ताव स्थगित ठेवण्याची विनंती केलेली आहे. या संबधी सहा.संचालक नगररचना यांचेकडून सविस्तर खुलासा घेण्यात यावा स.सदस्य श्री मुजीब खान यांनी असे म्हटले की या अगोदर या जगेचा मोबदला देण्यात आलेला आहे. तो दिला की नाही खुलासा घ्यावा.

सहा.संचालक(न.र.) : हा जे रस्ता आहे तो १९७५ च्या विकास योजनेमधे हा रस्ता नव्हता हा रस्ता २००१ च्या विकास योजने मधे प्रस्तावित करण्यात आलेला आहे. त्याचे रेकॉर्ड पाहता २००१ मध्ये या प्रस्तावाला भूसंपादन अधिकारी मार्फत भूसंपादन करावे अशी मा.आयुक्तांनी २००१मध्ये मंजुरी दिलेली होती. त्यानंतर श्री. आर.पी. नाथ हे न्यायालयात प्रकरण दाखल केलेले होते. त्यांनी सप्टेंबर २००४ मधे ज्यांना आता मोबदला मिळावयाचा आहे त्यांचेशी समझोता केलेला असून त्यांनी त्यांचे रिट परत घेतलेले आहे. त्या लोकांनी मागणी केलेली आहे त्यानुसार प्रस्ताव सादर केलेला असून हा रस्ता १९९५ मधे महानगरपालिकेने तयार केलेला होता. या संबधी न्यायालयात प्रकरण वगैरे आहे काय या विषी विधी सल्लागार यांचेकडून

अभिप्राय घेतलेला आहे. मावेज दिल्याबद्दल आक्षेप येत आहेत, परंतु या विभागाच्या रेकॉर्डनुसार मावेज दिल्याचे दिसून आलेले नाही. मा.आयुक्तांनी जे शेरा दिला होता तो लेखा विभागाचा व मालमत्ता विभागाचा रिपोर्ट घेवून खात्री करावी. माझा असा समजझालेला होता की स्थायी समिती समोर पाठवण्यापूर्वी या बाबतीत ही खात्री करून घ्यावी या संबधी मुख्य लेखाधिकारी यांचेशी चर्चा केली. त्यांनी असे म्हटले की भूंसपादनाचा विषय असल्यामुळे नगर रचना विभागाशी संबधीत आहे. मालमत्ता विभागाने लिहुन दिले की, मोबदला देण्याची बाब त्यांचे विभागाशी संबंधीत नाही. या संबधी मा.आयुक्तांशी चर्चा झालेली आहे. त्यांनी असे म्हटले की ती संचिका पुन्हा मला दाखविणे आवश्यक होते. त्यासाठी हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यास विनंती आहे.

श्री.बारवाल गजनन : या सबंधीची माहिती मा.आयुक्तांना संबधित अधिकारी यांनी द्यावयास पाहिजे होती. संभ्रम निर्माण झालेला आहे. मा.आयुक्तांशी चर्चा करून हा प्रस्ताव यावयास पाहिजेहोता. यापूर्वी या जगेच्या बाबतीत मोबदला दिलेला आहे कि नाही याचा खुलासा प्रशासनाकडे नाही निश्चित ही जगा कोठे आहे. काही सदस्यांचे म्हणणे असे की या रस्त्यावर डांबरीकरण झालेले आहे.यात कुठेतरी घोळ झालेला दिसतो याची गंभीर दखल घेण्यात यावी.

श्री.मुजेब खान : सर्व्हे नं ५१,५२,५३ मध्ये महानगरपालिकेने किती जगा संपादित केलेली आहे. किती जगा ताब्यात घेतली आहे. पाण्याच्या टाकीसाठी किती घेतली, या संदर्भात माझेकडे संपूर्ण रेकॉर्ड आहे. आपणाकडे दिले जईल. या रस्त्यावर महानगरपालिकेने डांबरीकरण केलेले आहे.

श्री.शंशांक विसपुते : नगररचना विभागाचे अधिकारी यांचेकडून पूरेसा खूलासा झालेला नाही.हे प्रकरण हाताळतांना यानंतर ही काळजी घेणे अपेक्षीत आहे की,यानंतर यामधे काही त्रृटी/दोष निघाल्यास स्थायी समिती जबाबदार राहणार नाही याची दखल प्रशासनाने घ्यावी.

सौ.लता दलाल : पूर्वी जे रस्ता होता तो किती फूट रूंद होता. मोबदला दिलेला आहे ते ८०',१००' फुटाच्या रोडचे दिलेले आहे का? की ४० फुटाच्या रस्त्याचे दिलेले आहे. की १९७५, १९९५ च्या विकास योजनेनूसार दिलेले आहे की,२००१ च्या डि.पी प्लॅन नुसार दिलेले आहे.याचा खुलासा करावा. नेमा कोणता रस्ता याचा खुलासा व्हावा. स.सदस्यांनी आक्षेप घेतलेले आहे.

श्री.मुजेब खान : १३२९ चा मुळ नकाशा माझ्याकडे आहे. त्यामधे औरंगाबाद शहरातील दोनच रस्ते दाखविलेले होते. (मा.सभापती यांचेकडे नकाशा देतात.)

सहा.संचालक (न.र.) : माझ्याकडे नकाशा दिल्यानंतर त्याची सविस्तर छाननी करून योग्य ती कार्यवाही केली जईल.

श्री.बारवाल गजनन : मोठी रक्कम द्यायची असतांनाही प्रस्ताव ठेवला कोणतीच माहिती समोर येत नाही योग्य प्रकारे सादर करण्यात येत नाही. अधिकारी सांगतात विषय स्थगित ठेवावा, तर आणला का?

सौ.लता दलाल : विषय मंजूर करावा प्रशासन जबाबदार राहील.

श्री.कवरसिंबबैनाडे : हा प्रस्ताव मंजूर करावा यास जबाबदार प्रशासन राहील हे सभागृह नाही असे रूलींग द्यावे.

श्री.मुजीब खान : प्रस्ताव मंजूर करण्यात येवू नये एक वेळेस मोबदला दिलेला आहे. दुसऱ्यांदा दिल्यास या सभागृहाची व महानगरपालिकेची बदनामी होईल याचीही दखल घ्यावी. प्रशासनाने चुकीने प्रस्ताव सादर केला . सभागृहाने मंजूर करून चुकीचा निर्णय घेणे बरोबर नाही. सविस्तर माहिती प्रशासनाकडून घ्यावी त्यानंतर यावर विचार करावा.

मा.सभापती : सदर प्रस्ताव हा प्रशासनाच्या माध्यमातून सादर झालेला आहे. प्रशासनामार्फत खुलासा करण्यात आला. मा.आयुक्त हे प्रशासनाचे प्रमुख आहेत. कलम ७७ नुसार स्थायी समितीला अधिकार आहे, त्या अधिकारानुसार स्थायी समिती समोर प्रस्ताव आलेला आहे. या प्रकरणी जिल्हा परीषदेचे ना हरकत प्रमाणपत्र, वृत्तपत्रात जहीर प्रगटन देऊन हरकती मागविल्या आहेत. यापूर्वी जगेचा मोबदला दिला किंवा नाही या बाबतीत लेखा विभागाने तपासणी करावी. बाधीत क्षेत्रासाठी यापुर्वी मोबदला दिला आहे का याची खात्री करावी, मालकी हक्काबाबत खात्री करून घ्यावी,सदर जगेचा यापुर्वी कोणत्याही प्रकारचा मोबदला दिला आहे का ते तपासावे व पुढील कार्यवाही करावी. लेखा विभागाने तपासणी करून घेण्यास व हा प्रस्ताव प्रशासना मार्फत आला म्हणून मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे गारखेडा येथील सर्व्हे क्र.५३/२/२ पैकी हितसंबंधीत मिळकतधारक श्रीमती बबाबाई लक्ष्मण पवार, श्री.राजेंद्र लक्ष्मण पवार व इतर यांचे उक्त मिळकतीमधून ८० फुट व ४० फुट रूंद रस्त पुर्वीपासून असलेल्या गाडी मार्गाचे ३० फुट रूंद रस्ता वगळून उर्वरीत क्षेत्र ४०५० चौ.मी. व ४० फुट (१२ मीटर) रूंद रस्त्याचे संपूर्ण क्षेत्र २१३६ चौ.मी. (सर्व्हे क्रमांक ५३/२/२ व ५३/२/१) या बाधीत क्षेत्राचा मोबदला सर्व वजवटी जता एकूण र.रू.१,२९,३०,०२६/- (रूपये एक कोटी एकोणतीस लक्ष तीस हजर सव्वीस फक्त) निश्चित केल्यानुसार बाधीत क्षेत्र नोंदणीकृत दस्तऐवज(रजिस्ट्री) करतेवेळी ५०% व उर्वरीत ५०% मोबदला संपादीत क्षेत्र मिळकतधारकाने महानगरपालिकेच्या नांवे नोंद करून दिल्यानंतर संबंधीतास एकूण मोबदला रकमेपैकी ५०% मोबदला श्रीमती बबाबाई लक्ष्मण पवार, श्री.राजेंद्र लक्ष्मण पवार व इतर, २५% मोबदला श्री.रविकिरण मधुकर सावजे व श्री.अशोक चांडूमल चोटलानी आणि २५% मोबदला श्री.शेख शकिल शेख बुढन पटेल यांना अदा करण्यास तसेच खरेदी खतासाठी लागणाऱ्या खर्चास मंजुरी देण्यात येते. तत्पुर्वी बाधीत क्षेत्रासाठी यापुर्वी कोणत्याही स्वरूपात कोणासही मोबदला दिला आहे का? तसेच मालकी हक्काबाबत खात्री करून घ्यावी. वरील सर्व बाबींची तपासणी करून लेखा विभागाने सविस्तर तपासणी केल्यानंतरच पुढील कार्यवाही करावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.७४ :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौजे भावसिंगपुरा येथील सर्व्हे क्रमांक १/१ मिळकतधारक श्री.सुगनचंद अमिरचंद मुगदिया जी.पी.ए. श्री.पवन सुगनचंद मुगदिया यांनी रेखांकन प्रस्ताव महानगरपालिकेस सादर केला असून त्या रेखांकनास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच उक्त मिळकतीमधुन मंजूर विकास योजना २४ मीटर रूंद रस्ता प्रस्तावित आहे. सदर रस्त्याने मिळकतधारकाचे ११६४.०७ चौ.मी. क्षेत्र बाधित असून उक्त बाधित क्षेत्राचा मोबदला मागणी केली आहे.

उक्त बाधित क्षेत्राचा मोबदला सर्व वजवटी जता रूपये ६,२८,६०८/- (रूपये सहा लक्ष अठ्ठावीस हजर सहाशे आठ) निश्चित केला आहे. मिळकतधारकाने उक्त बाधित क्षेत्र स्वखर्चाने

महानगरपालिकेच्या नावे ७/१२ वर नोंद करून देणे बंधनकारक राहील. वरील अटीस अधिन राहून मिळकतधारकास मोबदला देणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा.सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे भावसिंगपुरा येथील सर्व्हे क्रमांक १/१ मिळकतधारक श्री.सुगनचंद अमिरचंद मुगदिया जी.पी.ए. श्री.पवन सुगनचंद मुगदिया यांचे मिळकतीमधुन मंजुर विकास योजना २४ मीटर रूंद रस्त्याने बाधित असलेल्या ११६४.०७ चौ.मी. क्षेत्राचा निश्चित करण्यात आलेला मोबदला सर्व वजवटी जता रूपये ६,२८,६०८/- (रूपये सहा लक्ष अठ्ठावीस हजर सहाशे आठ) मिळकतधारकाने उक्त बाधित क्षेत्र स्वखर्चाने महानगरपालिकेच्या नावे ७/१२ वर नोंद करून देण्याच्या अटीस अधिन राहून मिळकतधारकास मोबदला अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.सभापती : वार्ड क्र. वार्ड क्र.४, ६, ७, ३०, ५० व ९४ चे स.सदस्य सर्वश्री रविकांत गवळी, विनायक पांडे, मिलींद दाभाडे, सौ.शोभा मिटकर, श्री.प्रशांत देसरडा व सौ.अल्पा जैन या सन्माननीय सदस्यांनी त्यांचे प्रभागातील कामांसाठी लेखाशिर्ष बदलणे बाबत विनंती केल्यानुसार लेखाशिर्षामध्ये बदल करण्यास मान्यता देण्यात येते.

**निर्णय :**

सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या कामांचे लेखाशिर्षात बदल करणेस्तव प्राप्त प्रस्तावानुसार वार्ड क्र.४, ६, ७, ३०, ५० व ९४ या प्रभागातील विविध कामासाठी लेखाशिर्ष बदलणे, आर्थिक तरतुद वळती करण्यास मान्यता देण्यात येते.

| वार्ड क्र. | पृष्ठ क्र. -अ.क्र. | **कामाचे नांव व अर्थसंकल्पातील तरतुद** | **नविन/सुधारीत कामाचे नांव व सुधारीत आर्थिक तरतुद** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| ४ | १५०/७० | हर्सुल हनुमान मंदीर ते हरसिध्दी मंदीरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे - २.०० लक्ष | एन-१३ भरतनगर येथील तुळजभवानी व हनुमान मंदीर समोरील खुल्या जगेवर सिमेंट कॉंक्रीट करणे | **२.०० लक्ष** |
| ६ | १४६/२६ | प्रभाग क्र. ६ लालमंडी कोळीवाडा गोगानाथमंदीरासमोरील गल्ली येथे शहाबाद फरशी बसविणे-रू.२.०० लक्ष. | प्रभाग क्र. ६ लालमंडी कोळीवाडा गोगानाथमंदीरासमोरील गल्ली येथे चेकर्ड टाईल्स बसविणे. | **२.०० लक्ष** |
| | १४७/२ | जयसिंगपुरा लालमंडी भागात रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे-रू.२.०० लक्ष. | प्रभाग क्र. ६ मध्ये विविध ठिकाणी विद्युत पथदिवे बसविणे. | **२.०० लक्ष** |
| ७ | १३३/५० | भिमनगर भावसिंगपुरा येथील खुली जगा विकसित करणे-१.५० लक्ष. | वार्ड क्र.७ मधील स्मशानभुमीसाठी रस्ता तयार करणे . | **१.५० लक्ष** |
| ३० | १३६/१० | हर्षनगर, तेलंगवाडा येथील सार्वजनिक शौचालय दुरूस्ती करणे-२ लक्ष | १. वार्ड क्र.३० मध्ये सार्वजनिक शौचालय दुरूस्ती<br>२. वार्ड क्र.३० मध्ये विविध ठिकाणी गटार दुरूस्ती करणे | **०.५०**<br>**१.५० लक्ष** |
| | १२६/२ | हर्षनगर, येथील ड्रेनेज लाईन टाकणे-५ लक्ष | वार्ड क्र.३० मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज दुरूस्ती व अपरूटीन करणे | **५.०० लक्ष** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५० | १६८/४ | गुरूरामदासनगर, सुराणानगर येथे मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे-३.०० लक्ष | लोकमत टाऊन सेंटर सिडको येथे मोठ्या व्यासाची जलवाहिनी टाकणे | **३.०० लक्ष** |
| | १७४/५ | मोतीवालानगर स्मशानमारोती मंदिर ते गांधीनगर पर्यंतची मेन सिव्हर लाईन दुरूस्त करणे -३.३२ लक्ष | सुराणानगर वार्डात खुली जगा विकसित करणे | **३.३२ लक्ष** |
| ९४ | १३२/२५ | बन्सीलालनगर येथील मनपाची खुली जगा विकसित करणे-१० लक्ष | प्रभाग क्र.९४ जलाननगर भागात मनपाच्या खुल्या जगेत जिम्नॅशियम हॉल बांधणे | **१० लक्ष** |
| | १२२/१४ | राहुलनगर भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे -२.५० लक्ष | जलाननगर भागात विविध ठिकाणी खडीकरण करणे | **२.५० लक्ष** |
| | १४९/३७ | **<u>लेखाशिर्ष-पुन:र्डाबरीकरण</u>** जहागीरदार कॉलनी व मगरीबी रेखांकन रस्तयाचे पुन:र्डांबरीकरण करणे - १० लक्ष | **<u>लेखाशिर्ष-नवीन खडी रस्ते</u>** जलाननगर व मगरीबी ले-आऊट भागात विविध ठिकाणी खडीकरण करणे व फुटपाथ बांधणे | **१६.०० लक्ष** |
| | १४९/३९ | **<u>लेखाशिर्ष-पुन:र्डाबरीकरण</u>** जलाननगर रस्त्याचे पुन:र्डांबरीकरण व फुटपाथ करणे - ६.०० लक्ष | | |

''राष्ट्रगीतानंतर''सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद